कार्तिक शके १८२४.

घटकाभर करमणूक

२०.

१ डिस्पेप्शिया ! !

२ उपकारांची उत्तम फेड.

३ होतें तें असेंच.

लेखक,

हरि नारायण आपटे,

प्रकाशक,

बाबाजी सखाराम आणि **कंपनी;**

मुंबई.

मुंबई—तत्त्वविवेचक प्रेस,


चलचित्रें दाखविणारें एक यंत्र.

किनोरा.

हें सिनेमेटोग्राफ, बायास्कोप, मुटॉस्कोप, ह्यांप्रमाणें "हालचाल करणारीं चित्रें" पहाण्याचें एक लहानसें यंत्र आहे. हें लहान टेबलावर किंवा मांडीवर घेऊन पहाण्याजोगें आहे. ह्याची



रचना अगदीं साधी असून आंतील चित्रें मोठीं मजेदार दिसता
हें यंत्र एक चांगली पेटी असून तींत घड्याळाप्रमाणें कम
बसविलेल्या आहेत. व त्यांत चित्रांचें रीळ बसविण्याची सो
केलेली आहे. हें रीळ म्हणजे ६००।७०० चित्रांचा ए
"चित्रसमूह"च होय. हीं चित्रें एकाच व्यक्तीच्या किंव



डिस्पेप्शिया ! ! !

(एक गोष्ट)

"दामोदर, रे दामोदर, पत्रें बित्रें कांहीं आलीं आहेत कीं नाहीं?" 'नाहीं!' असें उत्तर मिळतांच सकाळीं फेरफटका करून आलेले कृष्णराव वकील आपल्या ऑफिसमधील एका ईझीचेअरवर बसले. अलीकडे कृष्णराव अगदीं उदास दिसत असत. असें वाटत असे कीं, आपण अगदीं खंगलों आहों व अशक्त झालों आहों. असो. कृष्णराव ज्यावेळीं घरीं परत आले, त्यावेळीं राधाबाई घरांत कायसें करीत होत्या आणि इकडे कृष्णरावांची चर्या तर अशी दिसत होती कीं, त्यांच्या मनांत कांहींतरी चमत्कारिक व महत्वाच्या अशा विचारांनीं काहूर उठविलें असावें. आपल्याबरोबर बराच वेळपर्यंत ते तसेच पडून राहिले होते. थोडा वेळ गेल्यानंतर ते म्हणाले "हें पहा, आहे का माझा आतां कांहीं उपयोग? काय केलें मीं? एवढा शिकलों— हाडांचीं काडें केलीं—अभ्यास करून करून परीक्षांवर परीक्षा पास झालों. पण त्यापासून फायदा तो काय झाला? छे. छे. मीं फारच वाईट केलें? नसता एवढा मरे मरे तों अभ्यास केला तर काय झालें असतें? असा हा फाजील अभ्यास तरी माझ्या हातून काय होणार? शरीराची हानि मात्र करून घेतली. नसता रोग मात्र लावून घेतला, दुसरें कांहीं नाहीं. आणि ह्या माझ्या मूर्खपणाचीं,

हावरेपणाचीं व अविचाराचीं फळें आतां माझ्या लाडकीला भोगावीं लागणारना ? त्यापेक्षां माझें लग्नच नसतें झालें तर काय वाईट झालें असतें ? पण त्या लग्नाच्या नांवानें तरी कां दगड फोडायचे ? एकविसाव्याच वर्षींना माझें लग्न झालें ! मग त्याबद्दल माझ्या आईबापांनां तरी काय म्हणून दोष द्यावा ? त्यांनीं का मला शक्तीच्या बाहेर अभ्यास कर म्हणून सांगितलें होतें ? त्यांनी का रात्रंदिवस पुस्तकें उरावर घेऊन पड म्हणून सांगितलें होतें ? आग का लावायची आहे आतां या भाराभर परीक्षांना ? काय हें ? पंचविसावें वर्ष संपतें न संपतें तों आम्हाला क्षयाची भावना ? अहो, हा डिस्पेप्शिया म्हणजे क्षयाचा पायाच नाहीं तर काय ? एक घांसभर अधिक जेवण झालें, कीं, लागली अस्वस्थता व्हायला ! अमळ एखाद दुसरें भजें किंवा थालिपिठाचा तुकाडा खाल्ला, कीं उशाशीं मेणबत्तीचा दिवा पाहिजेच रात्रीं बेरात्रीं धांवायला ! काय ही आमची प्रकृति आणखी काय हें आमचें जिणें ! एव्हां पासूनच लागलें आमचें शरीर अगदीं फिकट नी निस्तेज दिसायला ! आतां आमच्या हातून आमच्या देशाचें हित तें काय होणार ! आम्हीं आमच्या समाजाची सुधारणा ती काय करणार ? काय करायची आमची विद्वत्ता, आमचें शहाणपण आणि आमचें ज्ञान. हाच जर आमचा क्रम कायम राहिला, दिवसेंदिवस आमच्यांत सुधारणा न होतां असेच अगदीं ज्वान जर आम्हीं राहिलों, तर काय, आमचा अवतार बहुतेक तिशीच्या आंतच संपा-

यचा ! मग आमच्या नांवानं आमच्या आईबापांनीं, बायकापोरांनीं आणि सर्व..."इतक्यांत दामोदर सात आठ पत्रें घेऊन धांवत धांवत आला. अर्थात कृष्णरावांनां आपले आत्मगत, परंतु जवळ आसपास असलेल्या मनुष्यास सहजी ऐकूं जाण्यासारखे विचार तेथेंच थांबवावे लागले. दामोदरानें दिलेल्या पत्रांतून कृष्णरावांनीं एक आपल्या ओळखीचें असें पत्र घेतलें. पत्र हातांत घेतल्याबरोबर त्यांना कसेंसेंच वाटलें. परंतु त्यांनीं तें एकदम फोडलें. सदरील पत्र इंग्रजींत होतें. आणि त्याचा सारांश असा होताः—कळविण्यास फारच वाईट वाटतें कीं, ज्या रोगानें आपणांस ग्रासिलें आहे, असा तुम्हाला आजपर्यंत निवळ संशय होता तो रोग खरोखरीच तुम्हांला त्रास देत आहे. एवढे दिवसपर्यंत तुम्हीं उगाच हयगय केलीत. आतां आपला रोग बराच अनावर झाला आहे. कोणीही डॉक्टरानें इतक्या स्पष्टपणें रोग्यास स्वतःस कधीं असें लिहूं नये, परंतु जें काय खरें असेल तें सांगा, यत्किंचित्सुद्धां भीड धरूं नका, मला त्याप्रमाणें विचार करून पुढची तरतूद करणें भाग आहे, असें आपण निक्षून सांगितलें म्हणूनच मी हें अगदीं स्पष्टपणें आपणास लिहित आहें. तथापि अगदीं निराशच व्हावयास नको, यांतूनही आपणास नीट करण्यास मी आपणाकडून होईल तितकें करीनच; कधींही माघार घेणार नाहीं."

"काय !" कृष्णराव आपल्याशींच म्हणाले, "खरोखरीच का माझा अवतार संपला? गणपतरावाचीसुद्धां खात्री झाली? आतां आणखीं काय पाहिजे? यावरून हें ठरलेंच कीं, मला अकालीं हा मृत्यु यायचाच! पण माझी बायको! माझा बाळ्या! हाय! हाय! काय सर्वांना मीं चांडाळ अगदीं पोरकें करून जाणार?"

कृष्णराव वरील वाक्य इतके मोठ्यानें बोलले कीं, तें घरांत राधाबाईसही ऐकूं गलें! त्या घाईघाईनें कृष्णरावाकडे आल्या परंतु त्यांच्या पावलांचा आवाज ऐकिल्याबरोबर कृष्णरावांनीं तें पत्र चटकन् चुरगळून खिशांत घातलें. तें काय आहे? कसलें पत्र आहे? असे प्रश्न यायला नकोत! राधाबाईनें आधींच ते आत्मगत भाषणांतले शब्द ऐकिलेच होते, तेव्हां त्यांनीं एकदम "काय? आतां काय बोलणें चाललें होतें? कोणाला पोरकें करून जाणार? हें आहे तरी काय आतांशा आपल्या डोक्यानें घेतलेलं? ज्या त्या गोष्टीचा नाद! अभ्यासाच्या दिवसांत अभ्यासाचा नाद. शरीराकडे पाहिलें नाहीं, हाडाचीं काडें केलीं, अभ्यास केला, परीक्षा झाल्या. आतां दोन पैसे मिळूं लागले. तर आतां हा 'कांहीं तरी होतं आहे, कांहीं तरी होतं आहे' असाच नाद लागला आहे. आतां याला म्हणावं तरी काय न् करावं काय? बरं गणपतराव भावजींकडे जाऊन, नाहीं तर त्यांना इथें एकदा बोलवून आणून, त्यांच्याकडून तपासून घेऊन, कांहीं औषध तरी घ्यावं, म्हणून आज किती दिवस म्हणतें आहें,

पण तें कांहीं होईना. आधीं खरं म्हटलं, तर होत नाहीं कांहींच. नुसती मनाची कल्पना बाधते आहे, दुसरं कांहीं नाहीं. बरं त्यांतून कांहीं होतंयसं वाटतं, तर याला उपाय नको का करायला? का आपलं असंच बसायचं? गणपतराव भावजी जीवापाड मेहनत करून नाहीं का औषध देणार? जावं एकदा त्यांच्याकडे, नाहीं तर असं कशाला? मी स्वतःच आतां जातें आणखी जाऊन त्यांना घेऊन येतें बोलावून!" असें म्हणून राधाबाईंना पदर घेतला.

त्याबरोबर कृष्णराव उसासा टाकून म्हणतात. "झालं गणपतराव भावजींचं झालं आणखी सगळ्यांचं झालं. अग नुसती कल्पनाच उगीच कशी होईल? तुझ्या या "कल्पना आहेत, कल्पना आहेत, कसला आला आहे डिस्पेप्शिया, कसलें आलें आहे अजीर्ण! अशा म्हणण्यानंच तर आजपर्यंत हयगय होऊन या थरावर गोष्टी आल्या. असो. झालं. आतां काय त्याचं? गणपतराव मोठा स्नेही झाला आणखी अतिशय काळजी त्यानं घेतली म्हणून काय आमच्या नशिबीं आहे तें का चुकतें आहे कोणाला? आतां थोडे दिवसांचा तुमचा आमचा संबंध राहिला इतकंच!" असें म्हणून पुनः त्यानें दोन उसासे टाकले. कृष्णरावांची आपल्याला कांहीं झालें असून तें अगदीं अनावर झालें आहे व आपण त्याच्या तडाक्यांतून सुटत नाहीं अशी कुरकुर आज बरेच दिवस चालली होती. आज काय पोटांतच खुटखुटतें, उद्यां काय आमांशच झाला, परवां छातींत जळजळतें, तेरवां पोट

फुगलें, असें रोज कांहींना कांहीं तरी आपणांस होतें असें त्यास वाटे, आणि तें नुसतें वाटतेंच आहे त्यांत तथ्यांश कांहीं नाहीं असें राधाबाईस वाटून त्या त्याप्रमाणें बोलत. वस्तुतः प्रकार काय होता हें ज्याचें त्यास ठाऊक. त्याचा बाह्य परिणाम कोणाच्याच नजरेस अजून पडूं लागला नव्हता. मात्र गणपतराव डॉक्टराजवळ तो आपला फार स्नेही म्हणून मोठ्या विश्वासानें जेव्हां जेव्हां कृष्णराव आपल्या आजाराची गोष्ट काढी, तेव्हां तेव्हां गणपतराव त्याची निवळ थट्टा उडवून त्यास तुला मोनोम्यानिया (एकाच गोष्टीचें वेड)लागलें आहे असें म्हणे. शेवटीं एकवार गण पतरावास एकटाच गांठून गंभीरपणानं एकदा विचारावें आणि त्याही वेळीं नीट पाहून उत्तर दिलें नाहीं, तर त्याचा नाद सोडून दुसऱ्या कोणत्या तरी डॉक्टराकडे जाऊन आपल्या रोगाची परीक्षा करून घ्यावी असा त्यानें निश्चय केला. व आदलेच दिवशीं संध्याकाळीं त्यानें गणपतरावा-कडे जाऊन अतिशय गंभीरपणानें त्यास आपली हकीकत सांगितली. त्यावेळीं काय झालें तें आतांच सांगण्यांत स्वारस्य नाहीं, सबब तें आतांच न सांगतां पुढील हकीगत-कडे वळूं.

इतक्या निराशेचे उद्गार ऐकिल्यावर त्या बायकोला काय वाटलें असेल, याची कल्पनाच करावी. आपण खरोख-रीच नवऱ्याच्या या स्थितीला कारण झालों काय? असें मनांत येऊन तिला धसका बसला व ती एकदम रडूं लागली.

पण ती धीराची होती. आणि नवऱ्याला खरोखर कांहीं दुखणें नाहीं, यदाकदाचित् किंचित् असलें तर तें इतकें मनाला लावून घेण्याजोगें नाहीं, असें तिच्या मनाला अद्यापि वाटत होतें, तेव्हां ती पुनः म्हणते, "गणपतराव भावजींचें झालंन् सगळ्यांचें झालें म्हणजे काय? त्यांच्याकडे जाऊन त्यांना नीट सगळं सांगून तपासून घेतलं का? आपलं आपल्याशींच कांहीं तरी मनाला लावून घेऊन बसायचं?"

कृष्णराव त्रासून म्हणतो "काय त्रास आहे बुआ? मीं आतां तुला सांगितलं ना कीं गणपतरावाला विचारलंन् सगळं झालं म्हणून—मोठे आमचे स्नेही ते. पहिल्या प्रथम माझ्या मनांत शंका आल्या दिवसापासून त्याला सांगतों आहें, कीं धंदेवारी घालवूं नको बरें? पण छे. त्यानं इथं यावें, तुझ्या देखत थट्टा करावी! तूं हंसावंस, मी आणखी कांहीं बोललों कीं टर करावी. क्लबांत मंडळींत गेलों कीं, मला, 'ओ! लो! मिस्तर डिस्पेप्शिया! कसं काय आहे तुमचं पोट? कसा काय आहे तुमचा म्यानिआ?" असें म्हणून मंडळीस हंसवावें म्हणजे झालं. अन् मला एखाद्या तिऱ्हाइतासारखें लिहितो कीं, तुमचं दुखणं आतां अनावार झालें आहे. पहिल्यापासून तुम्हीं त्याची काळजी घेतली नाहींत. पुन्हा गुलामाचें तोंड सुद्धां पाहूं नये असें मला वाटतें. कसले हे स्नेहीन् कसलं काय? मला वाटतें फी मिळायाची नाहीं या भयानं आणि औषधाचे पैसे येणार नाहींत या भयानंच यानं आजपर्यंत सगळा प्रकार थट्टेवारी

घालवला. तें कांहीं नाहीं. आतां त्याचा नाद सोडून देऊन आपलं दुसऱ्या एखाद्या डाक्टराच्या कच्छपीं लागलं पाहिजे. स्नेही बरं हे! हे स्नेही! वाचा वाचा हें पत्र!" असें म्हणून त्यानें तें चुरगळून खिशांत घातलेलं पत्र तिच्या अंगावर टाकलें. राधाबाईला बिचारीला काय वाचायला येणार? पण तिनें तें उचलून घेतलें आणि कोणा-पासून तरी वाचून घेऊं असं मनांत आणून आपल्याजवळ ठेवलं. कृष्णरावाचा चेहरा अगदीं उदास झाला. आज-पर्यंत जें भय त्यास वाटत होतें, तें कायम झाल्यामुळें त्यास फारच वाईट वाटलें. आजपर्यंत लोकांनीं "तुम्हांला कांहीं झालें नाहीं हो. अगदीं तुमची निवळ कल्पना-आहे" असें म्हटलें, म्हणजे एखादवेळीं तरी असें वाटे कीं, खरोखरीच आपली नुसती कल्पना असेल. आणि कल्पने-नेंच आपण आपलें शरीर झिजवून घेत असूं. पण आज त्या गोष्टीचा अगदीं निकाल लागल्याप्रमाणें झालें. कल्पना कल्पना करून लोकांनीं आपणांस फसविलें, आणि आपण काळजी घेऊं घेऊं म्हणतां म्हणतां ती आपल्यास घेतां आली नाहीं, याबद्दल त्याला अतोनात वाईट वाटलें.

नवऱ्याचें दुखणें खरोखरीच अनावार झालें आहे असें जर खचित असेल, तर त्याचा दोष आपल्या माथीं येतो. आपण खरोखरीच विनाकारण थट्टा करून त्यांस औषधें करूं दिलीं नाहींत याबद्दल तिलाही फार वाईट वाटलें. तिनें आपल्या अश्रूपूर्ण नेत्रांनीं तीनतीनदां आपल्या नवऱ्या-

कडे पाहिलें. हेतु हा कीं, दुखणें अनावर होऊन अगदीं निराशा होण्याजोगें कांहींतरी चिन्ह दिसतें आहे कीं काय हें पहावें. पण तसें तर कांहीं दिसेना. तेव्हां ती मोठ्या बुचकळ्यांत पडली. नवरा म्हणतो त्याप्रमाणें खरोखरीच गणपतरावानें आपल्या पत्रांत लिहिलें असल्यास गणपतराव कांहीं उगीच लिहिणार नाहीं. पण खरें असलें, तरी गण-पतरावानें असें ल्याहावें कीं काय? त्याला इकडला स्वभाव ठाऊक, कीं दुखणें एकपट असलें तर शंभरपट वाटून रिकामी मनाला हाय घेऊन बसायचें, आणखीं त्यानें असें लिहिलें कसें? पत्र आपण कोणाकडून नीट वाचून घेऊन मुकाट्यानें गणपतरावाकडे जाऊन मग त्याचा निकाल करून घेऊं असा तिनें आपल्या मनांत विचार केला. आणि नवऱ्याच्या मनास कांहीं समाधान द्यावें या हेतूनें ती त्यास म्हणते, कांहींतरी थट्टेनें लिहिलें असेल गणपतरावांनीं बरं. नीट वाचलें नसेल. मी म्हणतें जर खरोखरीच तसं कांहीं काळजी करण्यासारखं असतं, तर त्यांनीं असं आपण म्हणतां असं कधीं लिहिलं नसतं. आपण नेहमीं नेहमीं तेंच तेंच घेऊन बसायचं, म्हणून त्यांनीं कांहीं तरी लिहिलं असेल झालं. दुसरें काय?

"पुरे. पुरे. मला कीं नाहीं या असल्या बोलण्याचा फार संताप येतो. आतां उगीच माझे थोडे दिवस राहिले आहेत, त्यांत संतापवूं नको. आपलं सुखासमाधानानं उर-लेले दिवस काढूं दे. मला प्रत्यक्ष भोगावं लागतं आहे.

त्यानं स्पष्टपणानें लिहिलें आहे कीं, स्थिती वाईट आहे. मग काय आतां? मला चमत्कार वाटतो तो, त्यानं मी आजपर्यंत हयगय केल्याचा दोष माझ्या माथीं मारला आहे, याबद्दल होय. चकचकीत त्यानं लिहिलं आहेन् कीं, आज-पर्यंत तुम्हीं हयगय केली त्यामुळं हा रोग इतका अनावर झाला आहे. तेव्हां आतां त्याला काय म्हणावं?"

इतकें म्हणून त्यानं पुनः उसासा टाकला. कांहींतरी दुसरा विषय काढून यांचें चित्त दुसरीकडे नेलं पाहिजे असें मनांत येऊन तिनें म्हटलें. "बरं पण, वन्संनीं बोलावलं आहे, तिकडे चार दिवस हवा बदलायला तरी जाऊं म्हणजे बरं वाटेल. हवा बदलल्यानं कांहीं कमी नाहीं बरं वाटत. तिकडची हवा आणखी कायशी चांगलीही आहे."

"चांगलीन् वाईट, आतां सगळीकडे सारखीच हवा आहे आम्हांला, आतां एकदाच हवा बदलेल म्हणजे झालं!"

"हें काय असलं बोलावं? मी अगदीं खचित सांगतें कीं, कांहींतरी चूक झाली आहे. नाहींतर गैरसमज झाला आहे. गणपतराव भावजी कांहीं असं त्याहायचे नाहींत, नाहींतर त्यांनीं थट्टा केली असेल."

"तर! तर! थट्टा केली असेल!" कृष्णराव वस्कन् अंगावर येऊन म्हणतो. "आमच्या सगळ्या जन्माची थट्टा झाली आहे. आम्हीं मरून कांकूड होऊन पडलों तरी सुद्धां तुम्हांला वाटणार हा थट्टेनेंच मेला आहे. तेव्हां

देखील सारी मंडळी मिळून माझ्या मढ्याची थट्टा करून हंसा म्हणजे झालं! ”

कृष्णराव हे सर्व शब्द इतक्या संतापानें बोलला, कीं आपण कोणीकडून तोंडांतून शब्द काढले असें वाटून राधाबाई अतोनात पस्तावली. आणि तिला अनावर झालेला हुंदका आतां बाहेर पडेल या भयानं एकदम तेथून निघून चालती झाली. थोडा वेळ तसाच गेल्यावर तिनें हळकेच कृष्णरावाच्या कारकुनाला एकीकडे बोलावून तें पत्र त्याच्या पुढें टाकून म्हटलें, “दामू अण्णा, हें पत्र एवढं नीट वाचून मला त्यांत काय आहे तें नीट सांगा हो.” दामू अण्णांनीं पत्र पाहून त्यांतील साद्यंत मजकूर सांगितला. तो नवऱ्यानें सांगितल्याप्रमाणेंच होता. तथापि तो तिला बरोबर वाटेना. तिला असें वाटे कीं, कांहीं तरी यांत थट्टा तरी असावी, किंवा कांहीं चूक झाली असावी. खरें असलें, तरी गणपतराव इतक्या निक्षून कधींसुद्धां लिहिणार नाहीं आणि लिहिण्याचें प्रयोजन काय? दिवसांतून एखादी दुसरी तरी खेप व्हायची, निदान दोन दिवसांनीं तरी खास, असें असून त्यानें आधीं पत्र लिहिण्याचें कारण काय? हेंच तिला समजेना. नवऱ्याजवळ ह्या आपल्या शंका उच्चारून दाखविण्याची सोयच नाहीं. तो आतां अगदीं इतका हात पाय गाळून बसला, कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. सगळ्या रात्रींत एक क्षणभर सुद्धां त्याला झोंप नाहीं. आंथरुणावर पडे, पुनः उठे, येरझरा घाली. ते दिवशीं तिनें

आपल्याकडून त्यांस पुष्कळ प्रकारानें समाधानाच्या गोष्टी सांगून पाहिलें, परंतु कृष्णरावाचें समाधान होईना. आधींच तो हळवा आणि त्यांत गणपतरावासारख्या स्नेही डॉक्टरानें असें स्पष्ट सांगितलें कीं, तुमचा रोग अनावर झाला आहे. मग काय विचारतां ? पंचवीसदां तो बहिर्दिशेस गेला असेल, सत्तावीसदां त्यानें आपल्याला ताप आहे कीं काय म्हणून ज्वरमापक लावून पाहिलें असेल. आपल्याला श्वास लागला आहे असें तर कितीक वेळां त्यास वाटलें. त्या बिचाऱ्या बायकोस असें झालें कीं, ही रात्र उलटून एकाद्या चांगल्या डॉक्टराकडून परीक्षा होते कशी? "माझं अंग पहा बरं ताप कितपत आहे तो!" असें म्हणून त्यानें कितीदां तिला अंगाला हात लावून पहाण्यास सांगितलें आणि पाहून तिनें "कांहीं नाहीं, अगदीं गार आहे" म्हटलें म्हणजे एखाद वेळ तिच्या अंगावर येऊन "तुझं असंच, चांगला माझ्या हाताला लागतो आहेन् तुझ्या लागत नाहीं!" असें म्हणून थरमामीटर (ज्वरमापक) लावावें. दहा बारा मिनिटें लावावें. कांहीं ज्वर नाहीं असें त्यानें दाखविलें, म्हणजे 'तेंच वाईट आहे, जुनें झालें आहे,' असें तरी म्हणावें किंवा मला वाटतें माझें अंग गार पडत चाललें आहे, असाच नाद घेऊन बाटल्यांनीं शेकण्यापर्यंत पाळी आणावी! राधाबाईस बिचारीस ती रात्र सरतां सरेना. शेवटीं एकदांची सरली आणि सकाळ झाली. त्याबरोबर तिनें मी आतां स्वतः गणपतराव भावजींकडून जाऊन येतें

म्हणून उठली. पण हा गृहस्थ तिला जाऊं देईना. माझ्या जवळून हालूं नको. म्हणे कोण्यावेळीं काय होईल कोण जाणे! शिवाय गणपतरावाला न आणतां दुसऱ्या कोणातरी डॉक्टराला आणावा असा त्याचा विचार होता. आणि त्याप्रमाणें त्यांनीं दामोदराला—डॉक्टर यांस बोलावून आणण्यास सांगितलेंही. गणपतरावानें इतक्या विलक्षण तऱ्हेनें लिहिलें आहे, त्याअर्थीं तेही एकदां येतीलच. काल रात्रींच कसे आले नाहींत याबद्दलच तिला मोठें आश्चर्य वाटलें. इकडे कृष्णरावांची स्वारी तर अंतकाळ समीप आला म्हणजे मनुष्य निरवानिरव करूं लागतो त्याप्रमाणें करूं लागला. आणि राधाबाईस तसें कारण तर कांहींच दिसेना. गृहस्थाला सडकून भूक लागली तेव्हां कसेंसेंच होऊं लागलें, पण ती भूक हें त्याच्या लक्षांत येईना. भूक लागली असेल कांहीं सांजा बिंजा करून आणूं का, विचारलें असतां "कसचा बोडक्याचा सांजा करतेस? आतां सांजा कसचा आला आहे? बरं आण शेवटचा एकदां तुझ्या हातचा खाऊन घेऊं दे" असें म्हणाला. इतक्या त्या एकंदर स्थितींतसुद्धां खरोखर त्या बिचारीला हंसूं येण्याजोगें तो बोले. वरून तर त्याच्या त्या स्थितींत कांहींसुद्धां तिला कमी ज्यास्ती दिसलें नाहीं.

अशी एकंदर व्यवस्था चालली असतां—डॉक्टर आले त्यांनीं खिडक्या बिडक्या उघडून नाडी बिडी पाहिली. जीभ पाहिली पण त्यांस आजाराचें चिन्ह तर कांहींच दिसेना.

थरमामिटर लावून पाहिलें ताप नाहीं. तेव्हां शेवटीं काय होतें म्हणून विचारतां, यांनीं आपल्याकडून आपल्या डिस्पेप्शियाचें वर्णन दिलें. आणि क्षयाची भावनाही झाल्याचें सुचविलें. डॉक्टरांनीं पोट, छाती, पाठ तपासून पाहिली. लिव्हर, फुप्फुस किंवा दुसऱ्या कांहींही ठिकाणीं दर्द सांपडेना. डोळे पाहिले, पुनः नाडी पाहिली, जीभ पाहिली आणि बराच वेळ त्यांनीं आपलें डोकें खाजवून शेवटीं म्हटलें, "तुम्हांला कांहीं विशेष झाल्याचें आपल्याला तर आढळत नाहीं; तुम्हांला कांहीं झालंच नाहीं. डिस्पेप्शिया म्हणतां, पण त्याचें एकही लक्षण दिसत नाहीं. जीभ थोडी खराब दिसते, पण अशी जाग्रणानं किंचित् अजीर्ण होऊनही दिसते. कांहीं नाहीं, तुम्हीं जरा दोनदां तीनदां पौष्टिक पदार्थ खाऊन सकाळीं संध्याकाळीं चार दोन मैलांची रपेट करून येत जा. भूक लागत नाहीं म्हणतां, तर चार पांच दिवस घेण्यापुरतें औषध लिहून देतों तें घ्या, म्हणजे प्रकृती साफ होईल." असें म्हणून त्यांनीं भराभरा कांहीं खरडून तो कागद देऊन ते आपली फी घेऊन चालते झाले.

त्यांची गाडी वाजली असेल नसेल तोंच कृष्णराव राधाबाईला म्हणतात, "या डॉक्टरांना कांहीं सुद्धां समजत नाहीं. हे आमच्या गावांतले मोठे धन्वंतरी, आणखी यांनीं इतक्या निष्काळजीपणानं तपासून कांहीं नाहीं म्हणून सांगायचें. कांहीं अर्थ नाहीं यांच्यांत, झालं !" पण राधाबाईला त्या

डॉक्टराच्या बोलण्यानें किती तरी धीर आला. ती लागलीच त्यांस म्हणते, " उगीच आतां नादिष्टपणानं दुखणं दुखणं म्हणून काय करीत बसायचं ?" ही बोलाचाली होते आहे तों इतक्यांत गणपतराव डॉक्टरांकडून कोणी माणूस चिठ्ठी घेऊन आला. ती चिठ्ठी आंत कृष्णरावांच्या हातांत येतांच, " अशा प्रसंगीं आपण स्वतः येण्याचं टाकून चिठ्ठ्या पाठवतो आहे, आतां याला काय म्हणावं ? कसला स्नेही दगडाचा ? सगळा पैसा ! लेका, फी घे, नको कोणी म्हणतं आहे का काय ?" असें म्हणत त्यानें ती फोडली तों आंतून एकांत एक दोन चिठ्ठ्या निघाल्या. पहिली अशी होती:—

प्रिय मित्रा, माझ्या हातून काल एक मोठी गाढवासारखी चूक झाली. तुला पाठविण्यासाठीं चिठ्ठी लिहिलेली दुसऱ्याच एका रोग्याच्या पाकिटांत जाऊन त्यांच्यासाठीं लिहिलेली तुझ्याकडे आली. आजरोजीं सकाळीं मी त्यास पाहण्यासाठीं म्हणून गेलों, तेव्हां त्यांनीं ती मला दाखविली. तेव्हां माझी चूक माझ्या नजरेस आली. ती चिठ्ठी सोबत पाठविली आहे. मी ही चिठ्ठी त्याच रोग्याच्या घरीं लिहीत आहें. येथलें काम आटपण्यास बराच अवकाश लागेल, नाहींतर मी आतांच तुझ्याकडे येऊन क्षमा मागितली असती. दुपारीं तूं घरीं नसशीलच, तेव्हां संध्याकाळीं तुझ्या शिव्या खाण्याकरितां, आणि डिस्पेप्शियाची काल्पनिक रडगाणीं ऐकण्यासाठीं येतों. जेवायला रहाण्याच्याच बेतानें येईन.

धांदलींत असलेला तुझा मित्र—गणपती.

दुसरी चिठ्ठी होती ती अशी:—"प्रिय मित्रा कृष्णा, तूं भलतेंच कांहीं डोक्यांत घेऊन बसला आहेस याला आतां म्हणावें तरी काय? काळीज, फुप्पुस, लिव्हर, किडनी यांपैकीं एका-देखील भागाला कांहीं झालेलें नाहीं. रिकामें वेड काय आपल्याला लावून घेऊन नसतें दुखणें उत्पन्न करतो आहेस? चांगला दोन चार वेळ सांजा बिजा खाऊन (मला पंक्तीला घेतल्या शिवाय नव्हे हो पण)रोज दोन चार मैल रपेट करुन येत जा, म्हणजे असल्या कल्पनासुद्धां तुझ्या मनांत येणार नाहींत. शंके शंकेनेंच तूं मूर्खपणा करून आपल्याला व घरांतल्या मंडळीस नसता त्रास उत्पन्न करशील. माझी सगळी डिस्पेन्सरी पिऊं इच्छिणाऱ्या वेड्या पिरा—डिस्पेप्शिया-राज, हा नादिष्टपणा आपण लवकरच सोडा, नाहीं तर आपणाला कुलाब्याकडचें एक विशेष लोकांकरितां बांधलेलें घर दाखवावें लागेल!"

हीं दोनही पत्रें वाचतांच स्वारीच्या मनाची जरा चलबिचल झाली. तें आदले दिवसाचें पत्र आणून पुनः एकदां वाचून पाहिलें, तों खरोखरीच तें अत्यंत मित्रानें अत्यंत मित्राला लिहिल्याप्रमाणें नसून तिऱ्हाईत श्रीमंताला लिहिल्याप्रमाणें होतें. पण हें पहिले दिवशीं स्वारीचे लक्षांत आलें कोठें?

त्या थोरल्या डॉक्टरच्या सांगण्यानें अर्धवट साफ झालेलें मन आतां अगदीं साफ झालें, पण तसें बायकोला बोलून दाखविण्यास त्याचें मन धजेना. कारण ती आपली आणखी दूर उडवील. तेव्हां तीं दोनही पत्रें " पहा काय हे आचरट भावजी लिहितात तें! अगदीं मूर्ख बेटा! " असें म्हणत तिच्या अंगावर टाकलीं. आणि दामोदरास तीं वाचून सांग असें सांगितलें. तो अर्थ कळल्यावर "मी आधींच म्हटलें होतें हें असं कांहीं तरी झालं असेल!" असें राधाबाई म्हणाली, आणि " तूं असं म्हणणारच हें आम्हाला ठाऊकच" असं कृष्णराव म्हणाला. शेवटीं संध्याकाळीं गणपतराव येऊन त्यानें सर्व हकीकत ऐकून केलेली थट्टा, व कृष्णराव थट्टेनें चिडून संतापून त्यानें दिलेल्या शिव्या व शेवटीं "आम्हीं मरायला टेकलों तरी तुम्हीं आमची चेष्टाच करणार हें आम्हांला ठाऊक" असें उच्चारलेलें वाक्यें हीं मोठीं मजेदार होतीं. आपल्यास कांहीं झालें नाहीं, डिस नाहीं, आणि पेप्शिया नाहीं, असें खरोखरी वाटेपर्यंत दोन महिने लागले आणि तें वाटूं लागलें तरी त्यानें तसें स्पष्टपणें कधींच कोणाजवळ त्यांतून राधाबाईजवळ तर—नांव सुद्धां नको—कबूल केलें नाहीं. अजून सुद्धां तो असेंच म्हणतो कीं, गणपतरावाची व इतर सर्व डॉक्टरांची चूक आहे. मला डिस्पेप्शिया आहेच. 'स्वभावो दुरतिक्रमः!'

उपकारांची उत्तम फेड.

मी आपला गरीब बिचारा मास्तर. माझ्या हांतून परोपकार तो किती होणार? पण म्हणतात नाहीं, मनांत असलें म्हणजे कोणत्याही स्थितींत कांहींना कांहीं तरी परोपकार करतां येतो. हें तत्व ध्यानांत धरून मी नेहमीं माझ्या स्थितीप्रमाणें होईल तो परोपकार करीत असें. माझ्या पगाराच्या मानानें जितक्या गरीब विद्यार्थ्यांस फी देववेल, तितक्या विद्यार्थ्यांस ती देणें, कोणाला पुस्तकें देणें, कोणाला आपल्या फावल्या वेळांत थोडें बहुत शिकविणें, इत्यादि इत्यादि प्रकारांनीं मला जें जें काय करतां येईल, तें तें आम्हीं करीत असूं. आम्हीं म्हटलें आहे, त्यावरून वाचकांनीं ताडलेंच असेल कीं, माझी बायकोही मला या कामांत मदत करीत असे; आम्हांला स्वतःला मूलबाळ कांहीं एक नव्हतें परंतु गरीबांचीं दोन तीन मुलें आम्हीं बाळगलीं होतीं त्यांत एक घरींच जेवून असे, आणि दोघे आमच्या चाळींत माधुकरी मागत असत. माझी बायको त्यांस कालवण पाणी वगैरे मात्र देत असे. अशा रीतीनें क्रम चालू असे माधुकरी मागणारांत एक मुलगा चांगला अठरा वर्षांचा असे तो नुकताच आमच्या घरीं राहण्यास आला होता. त्यां आपली हकीकत अशी सांगितली कीं, आपण मूळचे चांग खाऊन पिऊन सुखी होतो; परंतु बापानें बाहेरख्याली सर्व पैसे उधळून टाकले; आईला फारच वाईट तऱ्हेनें वाग

विलें, यामुळें आईनें एके दिवशीं जीव दिला. पुढें कांहीं वाईट रोग होऊन बापही वारला. एक कवडीसुद्धां मागें न राहतां उलट कर्ज सपाटून राहिलें आणि त्यामुळें आपणास भिक्षा मागण्याची पाळी आली. ही त्याची हृदयद्रावक हकीकत ऐकून माझें आणि माझ्या बायकोचेंही चित्त फार द्रवलें, आणि आम्हीं त्यास तसाच ठेवून घेतला. तो एकवेळ मधुकरी मागे व आमच्या मदतीनें पोट भरून असे. माझ्या ओळखीच्या श्रीमंत लोकांकडे त्याचे दोन चार वारही लावून दिले होते. अशी एकंदर स्थिति होती.

हा नारायण आमच्या घरीं आम्हीं ठेवल्यापासून सुमारें दोन महिनेपर्यंत फार चांगल्या प्रकारानें वागला; परंतु पुढें त्याच्याबद्दल आमच्या कानावर कागाळ्या येऊं लागल्या. परंतु आम्हीं तिकडे अगदीं दुर्लक्ष केलें, कारण गरीबांला मदत करणारांपेक्षां त्यांच्या कागाळ्या सांगणारेच फार असतात. पुढेंपुढें पाहिलें तों त्याचें अभ्यासावर चित्तही कमी, आणि अभ्यास करण्याची इच्छाही अगदीं कमी दिसूं लागली. मी त्याला दोनदां अप्रत्यक्षपणें बोललों परंतु त्याचा कांहीं तादृश उपयोग झाला नाहीं. त्याचें वर्तन असमाधानकारकच दिसूं लागलें. आतां इतकें वय झाल्यानंतर, केवळ माधुकरी मागून अभ्यास करणें अशक्य असें त्याच्या मनानें घेतलें असेल, असें समजून मी त्यास तसें विचारलें व त्यानेंही चट्कन् आपले मनांत तसेंच वाटतें असें सांगितलें. शेवटीं मी त्यास चार दोन महिने अक्षर सुधार, मी तुला कुठें तरी लावून

देतों असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें अक्षर तर कांहीं विशेष सुधारलें नाहींच, परंतु एक दोन महिन्यांतच मीं त्यास शेट लक्ष्मीदास गोवर्धन यांचे येथें शिफारस करून त्यांच्या पेढीवर कावून दिला. कारण तो गुजराथींतसुद्धां तोंडपाटिलक्या करण्यास चांगला शिकला होता. परंतु माझ्या बायकोला व मला जी भीति होती त्याप्रमाणें पुढें लवकरच झालें. थोडेसें स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर तो आमचेकडे येईनासा झाला, आणि महिना पंधरा दिवसांतच त्याचें पेढीवरही कोणाचें न पटून त्यास पेढीवरून काढून टाकण्याची शेटजींस पाळी आली. "आपण आपल्याकडून त्याच्या बऱ्यासांठीं जितक्या गोष्टी करावयाच्या तितक्या सर्व केल्या, आतां त्याचें नशीब त्याच्या बरोबर, आपण त्याला काय करणार!" असें म्हणून आम्हीं दोघांनींही आपल्या मनाचें समाधान करून घेतलें.

या गोष्टीस सुमारें तीन महिने झाले. मी एके दिवशीं सुटी असल्यामुळें तिसरे प्रहरीं आपल्या घरीं कांहीं लिहीत बसलों होतों. 'वादविवाद शिकण्यासाठीं' दर आठवड्यास माझ्याच नजरेखालीं भरणारी माझ्या विद्यार्थ्यांची सभा भरत असे, तींत योजिलेल्या विषयाचा मी आपला विचार करीत होतों. इतक्यांत शेट लक्ष्मीदास गोवर्धनदास यांचे मुनीम घेलाभाई नथमल हे मजकडे आले. हे गृहस्थ कधीं मजकडे यायचे नाहींत असें असतां आजच कां आले? असें वाटून मी अगदीं गूढांत पडलों. नंतर त्यांस या, बसा, केल्यावर ते बसले. त्यांचा चेहरा अगदीं

अतोनात गंभीर दिसला. बसल्यानंतर थोड्याच वेळांत ते आपल्या मोडक्या मराठींत मला म्हणतात, "गोविंदराव मी कां आलों आहें, हें आपल्या लक्षांत आलें असेलच. असल्या गोष्टी कधीं लपत नसतातच. पण आपण त्यांतून चटूकन् निकाल करून मोकळें व्हावें तें चांगलें. झाली गोष्ट अतिशय वाईट." "पण, पण घेलाशेट तुम्हीं म्हणतां तरी काय? माझ्या तर कांहींच ध्यानांत येत नाहीं," मीं त्यांस अतिशय आतुरतेनें म्हटलें.

त्याची चर्या अविश्वासानें कशीशीच दिसली व तो व्याजो-क्तीचा आवाज काढून एकदम म्हणतो, "नाहीं येत ध्यानांत तर मी आणून देतों, ऐका. परवांच नोव्हेंबरच्या तिसऱ्या तारखेला, दोन प्रहरीं अडीच तीन वाजतां एक हजार रुपयांचा चेक आमच्या शेटच्या सहीचा म्हणून आग्राब्यां-केंत पटवून पैसे आणलेत. पैशाच्या भरपाईबद्दल रीतीप्रमाणें तुमची सहीही चेकाच्या पाठीवर आहे. आज दुपारीं बारा वाजतां कांहीं प्रसंगानं ही गोष्ट आमच्या नजरेस आली. आपल्याला कांहीं कामानिमित्त चेक दिला कीं काय, म्हणून शेटसाहेबांना विचारतां, त्यांचें म्हणणें कीं, आपण कधींच कोणाला असा चेक दिला नाहीं. चेकावर केलेली सही पहातानां असं दिसून येतें कीं, ती सही फार हुषारीनें केलेली आहे, परंतु खोटी आहे. चेक परत ब्यांकेंत नेऊन फार बारीक परीक्षा करून पाहतांही असें दिसून आलें व शेटसाहेबांचें म्हणणें कीं, ती सही खोटीच तेव्हां आतां

पहा काय आहे तें. ब्यांकेच्या चेकाकडील कारकुनाला विचारतां त्यानें पैसे घेणाराचं वर्णन दिलं, तें स्वरूप आणि आपलं स्वरूप अगदीं एक. आपण त्या वेळीं आपलें नांव सांगितलें. लवकर चेक पटवावा म्हणून त्याच्या भोंवतीं गर्दी लाविली. आतां झाली गोष्ठ झाली पुढें काय?"

" घेलाशेट, तुम्हीं काय म्हणतां मला समजत नाहीं. मी आजपर्यंत चेकाचें तोंड सुद्धां पाहिलें नाहीं."

" गोविंदराव," तो निष्ठुरपणानें एकदम म्हणतो, " गोविंदराव, तुम्हीं ब्राह्मण आहां, आतां निदान खोटं तरीं बोलूं नका आणखी. तुम्ही प्रत्यक्ष ब्यांकेंत गेलांत. तीन वाजण्याचा सुमार. चेक लवकर पटविण्याचं काम ज्याच्या-कडे, त्यानें तुम्हांला इतकं सुद्धां विचारलें कीं, तुम्हांला शेटजींनीं हे रुपये कां म्हणून दिले? तेव्हां तुम्हीं उत्तर दिलंत, 'मी शेटच्या गिरणींतल्या लोकांसाठीं नाइट् स्कूल (रात्रीची शाळा) काढणार आहें तिला खर्च लागेल, त्याच्यासाठीं देणगी दिली.'

हे सर्व ऐकून माझी खात्री झाली, कीं, कोणीना कोणी तरी कांहीं मोठी लबाडी केली आहे. आपली स्थिति मोठी भयंकर आहे हेंही माझ्या लक्षांत आलें. पण माझें मन स्वच्छ होतें, तेव्हां मला तसें कांहींच वाटलें नाहीं. मीं त्यांस लागलीच शांतपणें म्हटलें, " घेलाशेट, तुम्हांला कोणी तरी चांगलंच फसवलं आहे. आजपर्यंत कधीं मला शेटजींनीं

चेक दिला नाहीं. तो कोणत्याही मार्गानें माझ्या हातीं आला नाहीं. मीं कधीं तो पटविण्यासाठीं ब्यांकेंत गेलों नाहीं. आग्राब्यांकेचा चेक कसा असतो तो मी आजपर्यंत कधीं पाहिला नाहीं. आतां कां उगाच त्याची वाटाघाट?"

त्यानें चटकन् आपल्या खिशांतून तो काढला आणि चिमटीत धरून माझ्यापुढें केला. माझ्या हातांत देण्याइतकाही विश्वास त्यानें मजवर ठेवला नाहीं हें पाहून मला मोठें वाईट वाटलें; पण मी आपला गप्प बसलों. चेक नीट निरखला; त्यानं त्याची मागची बाजू मला दाखविली तेव्हां माझी सहीही पाहिली.

"ही सही तुमची नाहीं काय?" त्यानें पुनः निष्ठुरपणें विचारलें.

"माझ्या सहीसारखी दिसते, पण माझी नाहीं" मी उत्तर दिलें.

"गोविंदराव, विचार करा बरं, मुकाट्यानं झाली गोष्ट कबूल करून यांतून निसटून जा. शेटजी तुम्हांला सोडून देतील. आमच्या ब्यांकेचे डायरेक्टरही सोडून देतील. गोष्ट अजून षट्कर्णी नाहीं. शेटजींचा तुमच्यावर लोभ म्हणून त्यांनीं मला आपल्याला या सगळ्या गोष्टी समजावून सांगण्याला पाठविलें."

"शेटजींची मोठी दया आहे मजवर; पण येळाशेट माझ्या या गोंधळलेल्या स्थितींत तुम्हीं हे असले मर्मभेदक

शब्द बोलूं नका. जी गोष्ट कालत्रयीं माझ्या हांतून होणार नाहीं ती केल्याबद्दल माझ्या अंगीं तुम्हीं लावणें म्हणजे केवळ माझा विनाकारण छळ करणें आहे. माझा अपमान करणें आहे."

घेलाशेट पुनः म्हणतो, "पहा बरें! पुढं आतां काय होणार याचा पक्का विचार करा. तुमची स्थिति मनांत आणा. आपल्या बायकोचें कसें होईल हें मनांत आणा."

मीं अत्यंत शांतपणें त्यास म्हटलें, "मीं तुम्हांला सांगितलं, तें अगदीं खरें तें सांगितलें. आतां याउपर आणखी बोलण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं."

तो बिचारा लागलीच निघून गेला. मला वाटतें माझ्याबद्दल त्याला खरोखरीच वाईट वाटलें असावें. तो गेल्याबरोबर मी आपल्या बायकोला लागलीच बोलावलें, आणि झाली हकिकत सांगितली. ती ऐकल्याबरोबर तिला किती वाईट वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि तिनें यावेळीं तें सर्व वाईट वाटणें अगदीं गिळून घेऊन पुढें काय उपाय करावा अशा विषयींचा विचार काढला व आपणच आमच्या एका स्नेही वकिलांचें नांव सांगून त्यांच्याकडे ताबडतोब जाण्याविषयीं सुचविलें. तिनें दिलेल्या धैर्यानें माझें चित्त अधिकच शांत होऊन मीही ताबडतोब त्या स्नेही वकिलाकडे जाऊन काय खरी स्थिति होती, ती त्यास सांगितली. त्यानें सर्व ऐकून घेऊन

म्हटलें, " यांत दोन गोष्टी सिद्ध होतात. एक तर तुमच्या सारखा पोषाख वगैरे करून कोणी तरी चेक वटवायला गेला, आणखी दुसरं असं कीं, तुमची सही यानं खोटीच करून दिली. तुम्हीं गेलां नाहीं हें ठरवायला तुम्हीं स्वतः त्या दिवशीं त्यावेळीं होतां कुठें हें सांगितलं पाहिजे, आणखी चेक बनावट आहे, आपली सही नाहीं हेंही सिद्ध केलं पाहिजे. नोव्हेंबर तीन तारखेला दुपारीं तुम्हीं होतां कुठें?"

"दुसऱ्या कुठें असणार? शाळेंतच होतों."

" ठीक आहे. त्यावेळीं तुम्हीं शाळेंत होतां एवढी गोष्ट सिद्ध झाली, म्हणजे अर्धें अधिक काम झालें. आतां तुम्हीं घरीं जा. उद्यां सकाळीं मी तुमच्याकडे येतों, आणखी आपण शाळेंत जाऊन तुमची हजिरी लागली आहे कीं नाहीं हें पाहून हेडमास्तरांचें सर्टिफिकिट घेऊन ठेवूं."

आणखी थोडेंसें त्याच संबंधांत बोलणें होऊन मी आपल्या घरीं येण्यास निघालों, तों बरीच रात्र झालेली. मी आपल्या दारापाशीं येतों तों बायको अगदीं दारांत उभीच. मी येतों केव्हां आणि वकिलाच्या घरी काय झालें तें सांगतों केव्हां असें तिला झालें होतें. मला पाहिल्याबरोबर तिनें आपले डोळे पुसले. आतांपर्यंत एकसारखे चाललेले अश्रु माझ्या नजरेस पडूं नयेत ही तिची इच्छा. मीं लागलींच तिला आंत नेऊन झालेली हकीकत सांगितली. जेवणाची तयारी झालीच होती. दोघांनाही अन्नावर वासना नव्हती,

परंतु एकमेकांनीं एकमेकांना कांहीं तरी खाण्याबद्दल आग्रह केला. घरांत ठेवलेलीं एक दोन मुलें आपआपसांत कुजबुजत होतीं. हें आहे काय याबद्दल त्यांना मोठें गूढ पडलें असावें. जेमतेम मी सोंवळें नेसलों, संध्येचीं चार आचमनें टाकलीं, पान पुढें ओढून आतां पाणी फिरवणार तोंच दोन यमदूत येऊन त्यांनीं माझें नांव घेऊन "उठो, चलो," केलें. तें ऐकतांच माझी स्थिति काय झाली किंवा बायकोची स्थिति काय झाली हें सांगण्याचें मला कांहींच सामर्थ्य नाहीं. मीं मुकाट्यानं ताट पुढं सारलें, आणि त्यांच्या स्वाधीन झालों. जातांना बायकोला एवढंच सांगितलं कीं, देव खऱ्याचा वाली आहे, तूं भिऊं नकोस. धीर धरून दिवस काढ. आणखी आतां या पोरांपैकीं कोणाला तरी वकीलसाहेबांच्या घरीं पाठवून सगळी हकीकत त्यांना कळूंदे. या पोरांना जाऊं देऊं नको. मी सुटेपर्यंत त्यांचा चांगला संभाळ कर. मी सुटून येणार याबद्दल शंका नको."

शिपाई कशाला आले, शिपाई कशाला आले, असा प्रश्न चाळींत ज्याच्या त्याच्या तोंडीं झाला होता. व मी व शिपाई बाहेर पडतांच प्रथम ज्याला त्याला आश्चर्य वाटलें. पुढें ज्याला जें वाटलें तें कारण त्यानें लाविलें. असो.

मला पोलीसठाण्यावर नेऊन अडकवून ठेविलें. सकाळीं आठ साडेआठ वाजल्यावर वकीलसाहेब मला भेटण्यासाठीं आले. त्यांचा चेहरा फारच उतरलेला दिसला. ते

येतांच सगळ्या गांवभर काय झालें तें मला सांगितलें व खरा चोर पकडण्यासाठीं आपण खाजगी डिटेक्टिव यो-जिले असल्याबद्दल सांगितलें. नंतर हलकेंच त्यानें मला विचारलें, "बरं मग पण ते दिवशीं तुम्हीं कुठें होतां?"

"कुठें म्हणजे? शाळेंत. तुम्हीं हेडमास्तरांस भेटून अगर चिठी पाठवून माहिती आणवा."

त्यांचा चेहरा थोडासा विचार-गंभीर झाला. नंतर ते लागलीच म्हणतात, "गोविंदराव तुम्हीं ते दिवशीं शाळेंत गेलां नव्हतां. घरीं कांहीं खाजगी काम आहे अशा सबबीवर एक वाजतां निघून गेलां होतांत!"

जसा एखादा वज्राचा तडाखा बसावा तशीच माझी स्थिति झाली. शाळेंत मी ते दिवशीं नसेन असें माझ्या स्वप्नस्वप्नांतरींसुद्धां आलें नाहीं; परंतु वकीलसाहेबांनीं हेड-मास्तराची चिठीच आणली होती, ती ताबडतोब माझ्यापुढें केली! मग काय विचारतां? मी कां रजा घेतली असावी हें माझ्या ध्यानांतच येईना. मी आपल्याकडून पुष्कळ खटपट केली, पण व्यर्थ. मला तर कांहीं आठवेना आणि एकाएकीं एक वाजतां तेच दिवशीं मी रजा घेऊन गेलों हा पुरावा माझ्याविरुद्धच उपयोगी पडण्याला झाला!

योग्य वेळीं मला पोलीसकोर्टांत हजर तर केलेंच. प्रारंभीं जें काय व्हायचं तें सर्व झालें. सरकारतर्फेच्या वकिलानें पुरावा जमा करण्यासाठीं मुदत मागितली. अर्थातच

माझ्या वकीलानें त्यास तक्रार केली नाहीं. मात्र मला जामिनावर खुलें करावें असा अर्ज केला असतां तो माजिस्ट्रेटसाहेबांनीं कबूल केला नाहीं.

माझ्या ओळखीची कितीतरी मंडळी ते दिवशीं कोर्टांत जमली होती. त्यांच्या सर्वांच्या नजरेसमोर त्या स्थितींत उभें राहणें मला किती दुःखकर व लाजिरवाणें झालें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. कित्येक मजकडे दयापूर्ण दृष्टीनें पहात होते, कित्येक कींव वाटल्याप्रमाणें पहात होते. कित्येक संशयानें पहात होते व कित्येक तर मी खचितच कांहींतरी पेंचांत पडल्यामुळें हें कृत्य केलें असावें असेंही म्हणूं लागले असावे. त्या एकंदर घोंटाळ्यांत माझे कित्येक विद्यार्थीही आहेत हें पहातांच मला तर फारच वाईट वाटलें. पण करणार काय?

आपण खरोखर अपराधी नसतांना आपल्यावर हा गहजब येऊन गुदरला आहे, आणि आतां यांतून आपली सुटका करून घेण्याला तर कांहीं मार्ग दिसत नाहीं हें पाहतांच माझी स्थिति काय झाली असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. मीं कधीं म्हणतां कधींही शाळेंतून रजा घेऊन जायचा नाहीं असें असून दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास तेच दिवशीं रजा घेऊन गेलों हें एक विलक्षणच झालें होतें. तो एक अतोनात सबळ असा पुरावाच माझ्या विरुद्ध झाला. माझ्या वकिलानें मला निरपराधी ठरविण्या-

साठीं अतोनात मेहनत घेतली. पोलिसाकडून उलट पुरावा मिळविण्याची खटपट चाललीच होती. शेवटीं पोलिसाकडून मागितलेली मुदत संपली. पुनः जे दिवशीं खटला सुरू व्हायचा तो दिवस उगवला. मी ते दिवशीं रजा घेऊन कुठें गेलों होतों व तो दिवस कसा घालविला याच्याबद्दल अणुरेणु इतकी तरी माहीती मिळवावी म्हणून माझ्या स्मरणशक्तीला पुष्कळ चालविलें, आपल्या बायकोलासुद्धां विचारावें म्हणून आमच्या वकिलाला सांगितलें, पण कांहीं केल्या आठवेना. कारण त्याला दिवस बरेच झाले. कोर्टांत आमचा खटला सुरू होतांच अर्थातच पोलिसाची पुरावा देण्याची अगदीं गर्दी उडाली.

प्रथम पुरावा आणला तो हा कीं, मी दुपारीं शाळेंतून मुद्दाम सुटी घेऊन आधीं तयार करून ठेवलेला बनावट चेक वटवण्यासाठीं ब्यांकेंत स्वतःच गेलों! मला त्या सराफानें ओळखिलें. तो म्हणालाः—

"ब्यांकेंत चेकाचे पैसे घ्यावयाच्या पूर्वीं चेक योग्य तऱ्हेनें तपासून लवकर मजकडे यावा म्हणून त्यांनीं फार धांदल केली. आमच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें चांगला पाऊण तास लागायचा. कारण चेकाच्या पाळीनें पैसे मिळण्याची तजवीज व्हायची. एका मगून एक जसे चेक यायचे तसे आम्हीं एकाखालीं एक घालून ठेवतों. परंतु कांहीं लटपट करून आपण उशीरां येऊनही आपला चेक पुढें आणला. योग्य

मार्ग असून तुमची गर्दी कां, म्हणून विचारलें, तर आपल्याला वांद्र्याला जायचं आहे, गाडी चुकेल म्हणून उत्तर दिलेंत"

"कोणी? मी?" माझ्यानें न राहवून मी एकदम आपल्या त्या कैदीच्या पिंजऱ्यांतून विचारलें.

माजिस्ट्रेटानें मला कागलीच गप्प बसविलें, आणि त्या साक्षीदाराची जबानी पुढें सुरू केली. त्यानें पुढें आपल्या जबानींत असें सांगितलें कीं, माझी एवढी गर्दी पाहून आपण कागलींच तो चेक वटवण्यासाठीं हातीं घेतला आणि त्यांस शंभरा शंभराच्या दहा नोटा दिल्या. आमच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें आम्हीं नंबर सुद्धां टिपून ठेविले आहेत.

ते नंबर कोणचे हें विचारतां त्यांनें एक खिशांतून टिपण काढून कोर्टापुढें हजर केलें. उलट तपासणी माझ्या वकिलानें तहकूब केली.

पोलिसाकडला दुसरा साक्षीदार पुढें आला तो वांद्र्याचा एक मारवाडी होता. तो एवढीच साक्ष द्यायला आणला होता कीं, त्या नोटांपैकीं एक नोट त्याच दिवशीं आपल्या दुकानीं कैदीनं स्वतः येऊन देऊन संध्याकाळीं चारपांच वाजतां पैसे नेले. ती नोट पोलिसानें पकडली आहे तीच. माझ्या वकिलानें त्याचीही उलट तपासणी तहकूबच केली.

जो तो साक्षीदार मला अगदीं ओळखल्या सारखेंच करून बोलतो, याचें मला फारच आश्चर्य वाटलें. सर्वच

बनावट खटला म्हणावा, तर साक्षीदार केवळ लबाडीच्या साक्षी देणारे असतील असें दिसलें नाहीं.

इकडे मी आपल्या बाजूनें कांहीं पुरावा आणीन म्हणेन तर कांहीं कुठें पुरावा नाहीं, नुसता मी त्यावेळीं अमुक ठिकाणीं असेन असें जरीं आठवतें, तरी पुरे होतें. मग त्याबद्दल अधिक चौकशी करून खात्रीलायक पुरावा आणला असता. पण माझें ओढवलेंच. माझी विनाकारण फजिती होऊन मला कांहीं वर्षें कारागृहवास करण्याचें नशिबीं येणार असें मला पक्कें वाटूं लागलें. मी असा अगदीं निराश होऊन इकडे तिकडे पहात होतों. पोलीस आपलेकडून एकाहून एक अधिक असा पुरावा आणण्याची खटपट करीतच होते. त्यांच्या त्या पुराव्यानें इतकें खास झालें कीं, कोर्टांत असणाऱ्या प्रत्येक इसमाला "मीं खरोखरीच अपराधी आहें" असें पक्कें वाटलें. व त्यांचीं आश्चर्ययुक्त व खेदयुक्त अशीं कुजबुजणीं माझ्या कानावर येऊं लागलीं माझा वकील अगदीं निराशेनें माझ्याकडे पाहून जणूं काय तूं मेलास, आतां जगण्याची मुळींच आशा नको, असें मला आपल्या नेत्रांच्या द्वारें कळवीत होता. शेवटीं पोलीस पुरावा संपला. व माजिस्ट्रेटानें कैदीस तुला आपले कडून कांहीं पुरावा आणून आपला निरपराधीपणा ठरवून घ्यावयाचा असेल तर घे, असें सांगितलें. परंतु हें इतक्या विनोदाच्या व मर्मच्छेदक आवाजानें व शब्दांनीं

सांगितलें कीं, त्या योगानें माझ्या हृदयावर लाखों वार केल्या-पेक्षांही अत्यंत दुःसह असें दुःख झालें. अगदीं निराश-झालेला मनुष्य बुडत असतां सभोंवार पाहून आपले डोळे मिटून आपल्यावर ओढवलेल्या त्या प्रसंगाचा आतां पुढें कसा काय परिणाम होणार त्याचें चित्र डोळयांपुढें आणीत होतों. तो भयंकर तुरुंग, त्यांत भोगावे लागणारे हाल वगैरे एकंदर पुष्कळ गोष्टी मला दिसूं लागल्या. आणि इतकें सगळें केवळ बिनाकारण. हें सर्व मनांत येतांच परमेश्वराच्या न्यायीपणाबद्दल व दयाळूपणाबद्दल वेडेवांकडे कुतर्क मनांत येऊं लागले. माझ्या आईबापांनीं माझ्या मनावर परमेश्वराच्या दयालुत्वाविषयीं व न्यायीपणाविषयीं फार फार चांगले विचार ठसविले होते; परंतु आज एवढ्या ह्या एका भयंकर प्रसंगामुळें ते अजिबात नाहींसे झाले. नास्तिक-पणाचें जें काय अत्यंत भयंकर स्वरूप तें माझ्या मनांत शिरून संचार करूं लागलें.

कैदीच्या तर्फे कांहीं पुरावा येईलसें दिसत नाहीं, तर हा खटला रीतीप्रमाणें सेशन कमिट करण्यास आतां कांहीं हरकत नाहीं. असें म्हणून म्याजिस्ट्रेटनें आपला निकाल लिहिण्यास सुरुवात केली. इतक्यांत माझ्या वकीलानें आतां तरी मला जामीनावर खुलें करावें अशाबद्दल कोर्टाला अर्ज केला. परंतु अर्थांतच आतां तर त्या अर्जाचा मुळींही उपयोग झाला नाहीं. माजिस्ट्रेटच काय पण कोर्टांत असणाऱ्या

प्रेक्षकांपैकीं एकाच्याही मनांत मी अपराधी आहें याबद्दल शंका राहिली नाहीं. इतक्यांत एकाएकीं कोर्टाच्या दाराशीं जमलेल्या गर्दींत फार चळवळ उडाल्यासारखें झालें. काय आहे इकडे सर्वत्रांचें अर्थातच लक्ष्य गेलें. माजिस्ट्रेट साहेबांनीही आपलें लिहिण्याचें काम किंचित बंद ठेवून वर पाहिलें तों, बराच वृद्ध दिसणारा असा एक गृहस्थ " मला जाऊं द्या. मला जाऊं द्या. गरीब बिचारा नाहक मरतो आहे." असें म्हणत आंत येण्यासाठीं धडपड करीत होता. माझेंही लक्ष्य तिकडे गेलें आणि त्याला पाहतांच एकदम कांहीं एका बाबतींत इतका वेळ मी जो अगदीं मुरकुटून गेल्याप्रमाणें होतों, तो अंधार नाहींसा होऊन उजेड पडल्याप्रमाणें माझी स्थिति झाली. एकदम आतां आपण खास सुटणार असें मला वाटलें आणि वकीलसाहेबांस लवकर लवकर जवळ बोलावून सांगितलें कीं, " त्या म्हाताऱ्याला आंत घेऊन या, ज्या वेळीं मी शाळेंतून रजा घेऊन गेलों व ब्यांकेंत जाऊन चेक वटावला असें आतांपर्यंत पोलिसाकडून पुरावा देऊन सिद्ध करण्यांत आलें, त्याच वेळीं मी दुसरीकडे होतों अशाबद्दल हा म्हातारा खात्रीलायक पुरावा देईल." वकिलाला माझ्या त्या बोलण्याची खरोखर फारशी किंमत वाटली नाहीं असें दिसलें. तथापि त्यानें तसें कांहीं बाह्यतः न दाखवितां तो आपल्या जागचा उठून त्या म्हाताऱ्याकडे गेला. त्यास त्यानें आंत आणून माजिस्ट्रेट साहे-

बांस मोठ्या नम्रतेनें विनंती केली कीं, सरकार, माझ्या पक्षकाराचा निरपराधीपणा आपण सिद्ध करून देतों असें हा म्हातारा म्हणत आहे; तर याची साक्ष जरूर घ्यावी. म्याजिस्ट्रेटानें पहिल्या प्रथम बरिच कुरकुर केली. परंतु वकिलानें बराच नेट लाविला, तेव्हां ती साक्ष घेण्याचें कबूल केलें. मात्र साक्षीदारास एकीकडे नेऊन त्याच्याशीं बोलण्याची परवानगी वकिलास दिली नाहीं. लागलीच साक्षीदारास पिंजऱ्यांत उभें करून त्यास रीतीप्रमाणें शपथ वगैरे देऊन तुला या खठल्यासंबंधानें काय माहिती असेल ती सांग असें म्हटलें. त्याबरोबर तो म्हातारा एकदम म्हणाला, "सरकार, काल सकाळींच माझ्या हातांत हें वर्तमान-पत्र पडलें. त्यांतील मजकूर वाचून व विशेषतः "कैदी आपण निरपराधी आहों. खरोखर निरपराधी आहों. चेकाची हकिकत आपणास मुळींच माहीत नाहीं" असें म्हणतो. परंतु ज्या वेळीं चेक पटविला गेला त्यावेळीं म्हणजे नोवेंबर तारीख ३ रोजीं दुपारी एक वाजल्यापासून चार वाजण्याचें दरम्यान आपण कोठें होतों हें कैदीस सिद्ध करतां येत नाहीं. यामुळें त्याजवर गुन्ह्याचा पक्का संशय घेण्यास जागा आहे. कैदी आजपर्यंत फारच चांगला शिक्षक अशी त्याची कीर्ति आहे; परंतु त्यास ही दुर्बुद्धि कशी सुचली याचें आश्चर्य वाटतें. "विनाशकाले विपरीत बुद्धिः".

"हा मजकूर वाचल्याबरोबर माझ्या मनांत एकदम असें आलें कीं, केवळ विस्मरणामुळें बिचारे मास्तर आज या भयंकर स्थितींत सांपडले आहेत. आपण जाऊन खऱ्या खऱ्या हकीगतीबद्दल साक्ष द्यावी. सरकार, मास्तर त्या दिवशीं माझ्या घरीं होते. माझा चौदा वर्षांचा मुलगा मास्तरांच्या शाळेंत खुद्द त्यांच्याच वर्गांत होता. तो सुमारें पंधरा दिवस अतोनात आजारी होता. तेव्हां त्या आजारांत नेहमीं यांचें (मास्तरांचें) नांव काढी. शेवटीं नोव्हेंबर तारीख दोन रोजीं त्यानें फारच नाद चालविला कीं, मास्तरला बोलवून आणावें. मी ही दुसरें दिवशीं सकाळीं शाळेच्या पत्यावर मास्तरास त्याप्रमाणें जरूरीचें एक पत्र लिहिलें. व त्यांत मास्तरला 'तुम्हीं कसेंही करून त्याला भेटण्यासाठीं याच' अशी आग्रहपूर्वक विनंती केली होती. आणि त्या माझ्या विनंतीला मास्तरांनीं तत्काळ मान दिला. शाळेंतून रजा घेऊन ते माझ्या घरीं आले. व (अतोनात गहिंवरून) त्या माझ्या एकुलत्या एक अशा पोराच्या प्राणोत्क्रमणापर्यंत एकसारखे बसले होते. ते दिवशीं रात्रीं सात आठ वाजतां किंबहुना त्याच्याहीपेक्षां अधिक उशीर त्या रात्रीं त्यांस घरीं जाण्यास झाला असेल. माझा पोरगा फार चांगला होता. त्याची या मास्तरांच्या ठायीं अतोनात भक्ति होती. आणि मास्तरांचेंहीपण त्याच्यावर अतोनात प्रेम होतें. त्यांनीं त्यास फाजील हूडपणापासून दूर ठेविलें होतें. पण (अति शय गहिंवरून) मला तो लाभला नाहीं."

माजिस्ट्रेटः—(मध्येंच) पण तूं म्हणतोस या गोष्टी खऱ्या कशावरून? म्हताऱ्यानें उत्तर दिलें, "मी आणखीं साक्षीदार माझ्या घरांतलीं सगळीं माणसें आणून उभीं करीन. माझ्यामुळें या गरीब बिचाऱ्या पुरुषास विनाकारण इतके दिवस अशा या भयंकर स्थितींत घालवावे लागले, या बद्दल मी त्याची कशी क्षमा मागूं हेंच मला समजत नाहीं."

म्हातारा आणखीही बडबड करता, परंतु माजिस्ट्रेटानें त्यास पुढें बोलूं दिलें नाहीं. या संबंधांत आणखी चौकशी केली पाहिजे. आणखी पुरावा मिळविला पाहिजे म्हणून मेहेरबानी करून दुसरेदिवसापर्यंत खटला तहकूब ठेविला. व त्या म्हाताऱ्याच्या झालेल्या साक्षीवरून त्याचें अंतःकरण थोडेंबहुत मृदु झाल्यामुळें त्याचें त्यानेंच असेंही म्हटलें कीं, या गृहस्थाच्या साक्षीमुळें या खटल्याला आतां निराळें स्वरूप आलें आहे तर कैदीच्या वकिलाच्या अर्जाप्रमाणें कैदीस जामीनावर खुलें करण्यासही कांहीं हरकत नाहीं. याप्रमाणें मी ते दिवशीं जामीनावर खुला झालों. दुसरे दिवशीं अधिक आगळा त्या म्हाताऱ्याच्या घरच्या मंडळीच्या साक्षीपुरावा दिला. त्यावरून माजिस्ट्रेट साहेबांची पुरी खात्री झाली. शिवाय पोलीस तपासांत त्या ब्यांकेंतून गेलेल्या नोटींपैकीं आणखीही एक नोट पुणें मुक्कामीं सांपडली. ती नोट पुण्यास एका व्यापाऱ्याकडे तारीख सहा नोवेंबर रोजीं मोडली होती. तारीख सहा नोवेंबर रोजीं

मीं मुंबईच्या बाहेर गेलों नव्हतों. (कारण ते दिवशीं शाळेंत हजर होतों) अशाबद्दल हेडमास्तरचा पुरावा झाला. आणि ज्याजवळ ती नोट मोडली तो पुण्याचा व्यापारी तर माझेंच नांव सांगे. हें पाहतांच माजिस्ट्रेट साहेबांची माझ्या निरपराधीपणाबद्दल पुरी खात्रीच झाली. कोणी तरी माझें सोंग घेऊन माझ्या नांवाचें हें सर्व दुष्कृत्य केलें असें सर्वांस वाटूं लागलें. माझी तर सुटका झाली. परंतु माझ्यावरील आरोप सर्वथैव दूर होण्यास खरा अपराधी सांपडला पाहिजे असें माझ्या मनांत वाटतच होतें, व त्यामुळें माझें मन फार अस्वस्थ होतें. मी आपण होऊनच पोलिस डिटेक्टिव्हाकडे जाऊन त्यास विनंती केली कीं, कसेंही करून खऱ्या अपराध्यास तुम्हीं शोधून काढा. माझा जो संशय होता तोही त्यांस सांगून ठेविला. पोलिस त्या तपासांत होतेच. त्यांस तिसऱ्याही नोटीचा पुण्यासच तपास लागला. ती नोट दुसऱ्या नोटीनंतर आणखी दोन दिवसांनीं मोडली गेली होती आणि तेथून तीन दिवसांनीं या सर्व अपराधाचें मूळ सांपडलें. ज्या नारायण नांवाच्या मुलास मी आपले जवळ बाळगून त्याचा अगदीं मुलाप्रमाणें सांभाळ इतके दिवस करून शेवटीं शेट लखमीदास गोवर्धनदास यांचे दुकानीं लावून दिला होता, तो नारायणच या

सर्व कृत्यांचा आदिकर्ता होय. त्यानें माझी व शेटजींची दोन्ही सह्या करण्याचें काम उत्तम प्रकारें साधून वर सांगितल्याप्रमाणें शेटजींच्या चेकबुकांतील एक चेक चोरून त्याच्यावर एक हजारांची रक्कम भरून शेटजींची खोटी सही केली. आणि भरपाईच्या वेळीं घेणाराची सही पाहिजे ती माझी करून हुबेहूब माझ्यासारख्याच पोशाखांत भरपाई करून घेतली. ज्यांनीं त्याला विचारलें त्यांस त्यानें माझें नांव, पत्ता वगैरे सांगून दिला. आणि पुढें माझ्यावर खटला झाला असतांही खुशाल तो पुण्यास बदफैली करीत राहिला होता. अशा तऱ्हेनें त्यानें त्याच्यावर केलेल्या उपकारांची उत्तम फेड केली.

पुढें त्यास त्याच्या कर्माप्रमाणें अर्थातच फळें भोगावीं लागली.

होतें तें असेंच !

(एक गोष्ट)

त्रिकमलालशेटच्या तोंडून ते तसले कठोर शब्द कानीं पडल्याबरोबर आपल्या कानांत कोणीं तरी तापलेलें तेल ओतल्याचा बळवंतरावास भास झाला. कधीं म्हणतां कधींही हा असला प्रसंग आपल्यावर गुदरेल असें त्याच्या मनांत आलें नव्हतें. काय म्हणून येणार? आजपर्यंत शेटजींनीं एकवेळांसुद्धां कधीं गैरविश्वास दाखवला नाहीं. आपल्याविषयीं त्यांच्या मनांत गैरविश्वास आहे असा संशय घेण्यास जागासुद्धां कधीं झाली नाहीं. असें असतां आज एकाएकीं हा प्रकार काय?

आज तारीख शेवटली आहे. संध्याकाळीं नित्याप्रमाणें तुमचें काम आटपलें, म्हणजे माझ्या खोलींत या आणि टेबलाच्या उजव्या बाजूच्या खणांत रुपये ठेवले असतील ते घेऊन तुम्हीं जा. पेटीला तुम्हीं हात लावूं नका. किल्ली आतां माझ्याकडे द्या. पुनः कांहीं माझ्याकडे येण्याची तसदी तुम्हीं घेऊं नका. तुम्हांला मीं ठेवलें, तेव्हांच मला लोक सांगत होते कीं 'तुम्हीं दक्षिणी माणूस ठेवूं नका. आपला जातवाला ठेवा. हा दक्षिणी माणूस केव्हां दगा देईल याचा नेम नाहीं.' पण मीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. तुमच्या गोड बोलण्यावर आणि साळसूद चेहऱ्यावर विश्वास ठेवून आश्रय दिला. त्याची फेड चांगली झाली. आतां जा आपल्या कामाला लागा पुनः....'

" त्रिकमलालशेट! तुम्हीं काय म्हणतां याचा मला अर्थच समजत नाहीं. मला एकाएकीं घालवून देण्याला मीं केलें तरी काय?"

बळवंतरावाच्या तोंडून हे शब्द इतक्या घाबरत घाबरत आणि तुटक तुटक उच्चारले गेले कीं, कांहीं वर्णन करून सांगतां येत नाहीं. त्याची स्थिति फार भयंकर झाली. गरीब बिचारा! तोंडची भाकरी जाते, आणि ती आपल्या कोणत्या अपराधाबद्दल हें मुळींच समजत नाहीं. मग अशी भयंकर स्थिति होईल, यांत नवल काय?

वाचकहो, तुम्हांपैकीं कधीं कोणाला दारिद्र्य म्हणजे काय हें ठाऊक आहे?—नसेल तर फारच चांगलें. आणि तें कधीं नसोही—दारिद्र्य म्हणजे असें तसें श्रीमंती दारिद्र्य नव्हे! किती विपुलता असली, तरी अमुक नाहीं, तमुक नाहीं म्हणून रडगाणें गाणारें दारिद्र्य नव्हे. खरें दारिद्र्य सुदामदेवाचें. ज्याला अठरा विश्वे दारिद्र्य म्हणतात, तसकें दारिद्र्य ज्यानें अनुभविलें असेल, त्यालाच बळवंतरावाच्या त्या त्या वेळीं झालेल्या स्थितीचा अनुभव येईल. दुसऱ्यांना नाहीं यायचा. घरीं बायको आणि तीन मुलें. त्या सगळ्यांचा प्रपंच या एकट्या माणसानें मिळविल्या जाणाऱ्या पंधरा रुपड्यांवर! आणि त्याही आतां आजपासून मिळण्याचें बंद! मग काय?

बळवंतरावाच्यानें बोलवेना, तरी त्यानें पुन्हा एकदां

"त्रिकमलालशेट, एकदम इतका कठोरपणा करण्याला मी केलं तरी काय? मला तर कांहींसुद्धां दिसत नाहीं."

"नाहीं नाहींच तें दिसायचं. माझ्याच तोंडून तें काढावं स्पष्टपणानं यांत कांहीं तरी चांगलेपणा आहे काय? आतां तुम्हांला माझ्याच तोंडून ऐकायचें असलं, तर सांगतों बापडा. बळवंतराव, माझ्या खोलींत माझ्या टेबलावर ठेवलेल्या माझ्या पेटींतून रोज दहा दहा पंधरा पंधरा रुपयांच्या रकमा नाहींशा होतात, याची वाट काय! माझ्या घरांतला एकतरी माणूस कधीं त्या खोलींत जातो का? तुम्हीं कीं मी, याखेरीज कधींतरी कोणी त्या खोलींत जाऊन ती पेटी उघडतं का? नाहींना? मग पेटींतून अगदीं रोज कांहींना कांहीं तरी रुपये जातात, याचा अर्थ काय? आमचा मनसुख, तुम्ही आणि मी या तिघांखेरीज जर कोणी आंत येत नाहीं, पेटीला हात लावीत नाहीं, तर रुपये जावे कसे? कांहीं जादूनं तरी कोणी नेत नाहींना! आणखी मनसुख मला परवां सांगत होता कीं, तुम्हीं हल्लीं सट्याच्या बाजारांत फार फार जात असतां. तसें जर असेल, तर पैसे कुठें जातात आणि कसे जातात, याची शंका काय राहिली?"

हे शेवटले शब्द त्रिकमलालशेट बोलत असतां बळवंतराव अगदीं मान खालीं घालून उभे होते. त्रिकमलालशेटनीं शेवटीं बळवंतरावांवर जो आरोप आणला तो अगदीं खरा

होता. बळवंतरावाच्या डोक्यांत एकदां असें आलें कीं, आपणही या भाद्यावाण्यांप्रमाणें व्यापारांत पडावें, तर आपलें भाग्य उदयाला आलें तर येईल. नाहींतर चाकरीच्या दहान् पंधरा नाहीं शेंन् दोनशें रुपयांनींसुद्धां कांहीं उपयोग होणार नाहीं. हा किता बळवंतरावांच्या डोक्यांत शिरल्यापासून त्यांना आपण कांहींना कांहीं तरी व्यापारांत पडावें असें वाटूं लागलें. आणि शेटजींच्या बरोबर एकदां दोनदां सट्याच्या बाजारांत ते गेले असतां, तेथल्या कांहीं गोष्टी ऐकून त्यांनीं आपणही एकदां त्यांत पडून लवकर लवकर श्रीमंत व्हावें असें त्यांच्या मनानें घेतलें. मग काय विचारतां ? त्यांनीं एक वेळां अगदीं कोणास न कळवितां सट्याच्या धोक्यांत आपल्या जवळचे दहा रुपये घालविले. पण तेवढेच! पुनः त्यानें अगदीं कानाला खडा लावून घेतला. पुनः या पाजी-पणाच्या व्यापारांत आपण पडायचें नाहीं असा त्यानें मनाचा निश्चय केला. त्याच्या मनांत सट्याच्या व्यापारांत शिरण्याचें जरी सहजगत्या आलें, तरी तें विचाराच्या रूपां-तून कृतीच्या रूपांत येण्यास त्रिकमलालचा मुलगा मनसुख-रामच कारण झाला. मनसुखरामानें त्यांना भर दिली. परंतु, दुसऱ्याच्या भरीनें जरी झाली तरी ती आपल्या हांतून चूक झाली, आणि पुन्हा या भानगडींत पडायचें नाहीं असा त्यांचा निश्चय झाला होता. एकवेळां चूक झाली ती लाग-लीच त्रिकमलालशेटच्या कानापर्यंत येऊन तीबद्दल आप-

णाला असा इतका दंड व्हावा, याचा मात्र त्याला अर्थ कळेना.

आतां आपण घरीं गेल्याबरोबर बायकोला सांगावें तरी काय? बायको म्हणजे त्याला परब्रम्ह होतें. तिच्या सुखाकरितां याला कुठे पाहिजे तेथें जाऊन पाहिजे तितके श्रम करण्यास सांगितले तरी तो ते करण्यास कधीं मागें घ्यायचा नव्हे. तिला काम पडूं नये, तिच्या मनाला किंवा शरीराला कोणच्याही प्रकारचा त्रास होऊं नये म्हणून जितकी खबरदारी घेणें जरूर असेल, तितकी तो स्वतः घेण्यास कधींच मागें घ्यायचा नाहीं. अशा त्या बायकोला आतां जाऊन काय सांगणार? त्याच्या गरिबीच्या स्थितींत तो इतका तिला जपत असे, आणि तीही त्याच्या सुखाकरितां जपत असे, आपण अगदीं श्रम करूं नयेत असें नवऱ्याला वाटतें, तर आपण कांहीं श्रम करित नाहीं, असेंच दाखवून चोरून तिनें दुसऱ्याच्या टोप्या विणणें, कशिदा काढणें वगैरे कामें करावीं आणि संसारांत होईल तितकी मदत करावी. दारिद्र्यामुळें बळवंतरावाच्या तोंडून कधीं निराशेचे उद्गार निघाले, तर तिनें त्याला नेहमीं समाधानाच्या गोष्टी सांगून—कधीं कोणचीही आपल्या स्वतःची किंवा मुलांची ददात त्याच्या नजरेसमोर आणूं न देतां—अशा तऱ्हेनें दोघें आपल्या संसाराचा गाडा ओढीत होतीं. पण आजच्या या दुःखाच्या डोंगरानें फारच कमाल झाली. ती इतकी कीं, त्यामुळें पुढें होणाऱ्या आपल्या

भयंकर स्थितीचें चित्र बळवंतरावाच्या नजरसमोर उभें राहून त्यास एकदम हुंदका आला व तो एकदम त्रिकमलालशेटजींचे पायां पडून आर्जव करूं लागला. सट्याच्या व्यापारांत आपण एकदां कां होईना पण पडलों याबद्दल क्षमा करण्याविषयीं तो त्यांच्या फार विनवण्या करूं लागला. त्याला वाटलें कीं, त्रिकमलालशेटजींस कदाचित् आपली करुणा येऊन ते आपल्याला गय करतील व आपल्याला अन्नावरून काढणार नाहींत.

"शेटजी एकवेळां जें झालें. तें झालें, मला त्याबद्दल क्षमा करा. पण अशा तऱ्हेनें भलताच आरोप माझ्यावर ठेवून मला आपल्या नोकरीवरून दूर करूं नका. कसली पाहिजे तसली शपथ वाहून सांगतों कीं, तुमच्या पेटींतून मीं कधीं तुमच्या कामाखेरीज एक पैसुद्धां काढली नाहीं. तिथून पैसे जातात आपण म्हणतां, तर मला एक आठ दिवस फुरसत द्या. म्हणजे मी तुम्हांला चोरी करणाराचा पत्ता लावून देतों. पण माझ्यावर विनाकारण आळ घालूं नका. सट्याचा व्यापार करण्याचा वेडेपणा मीं एकदां केला खरा, पण त्याच्या करितां आपल्या पैशाला हातसुद्धां लावला नाहीं कीं कांहीं नाहीं. एक आठच दिवस मला सवड द्या. मी चोराचा पत्ता खास लावून देतों. मला चोर म्हणून विनाकारण बेअब्रू करून घालवूं नका?"

पण त्रिकमलालशेटच्या मनावर या त्याच्या बोलण्याचा कांहींही परिणाम झाला नाहीं. ते उलट म्हणाले:–

बळवंतराव, तुमच्या या असल्या बोलण्याला आतां फसणारा मी माणूस नाहीं. तुम्हीं आतां जें काय बोललांत, त्यानें उलटें माझें मन तुमच्या संबंधानें जास्तीच वाईट झालें आहे. जा आतां अधिक शोभा करून घेण्यांत तात्पर्य नाहीं. मुकाट्यानें जाऊन कामाला बसा. वास्तविक मी आतां असेंच तुम्हांला घालवून द्यायचें, पण गय करून आल्या सारखें रोजच्याप्रमाणें दुकानांत काम करूं देतों कीं लोकांच्या दृष्टीला कांहीं वावगें येऊं नये. तेव्हां सांगितल्या-प्रमाणें मुकाट्यानें संध्याकाळपर्यंत काम करा आणि पगार घेऊन चालते व्हा, पुनः मला तोंड दाखवूं नका."

इतकें अत्यंत कठोर वाणीनें बोलून आणि कपाळाला आंठ्या वगैरे घालून तितक्याच कठोर दृष्टीनें त्यांच्याकडे पाहून त्रिकमलालशेट तेथून चालते झाले. बळवंतरावाला त्यावेळीं संताप व खेद इतका झाला कीं, आतां काय करूं आणि काय नाहीं असें त्याला होऊन गेलें; परंतु घरीं आपल्यासाठीं एकसारखी काम करीत बसलेल्या आपल्या बायकोची मूर्ती त्याच्या नजरेसमोर दिसून त्याचें मन किंचित् मृदु झालें. आणि तो लागलाच आपल्या कामावर गेला.

बळवंतराव कामासाठीं म्हणून दुकानांत जाऊन वह्या सोडून बसला खरा, परंतु त्याच्या डोक्यांत आपल्या भावी स्थितीखेरीज दुसरें कांहीं तरी येत होतें काय ? आतां आज संध्याकाळचा हा पगार घेऊन गेलों, म्हणजे पुढें करायचें

काय? कोठेंहीं कोणाच्या दारीं नोकरी मागण्यास गेलों, आणि त्यानें पूर्वीं कोठें होतां काय, म्हणून प्रश्न विचारला तर उत्तर काय द्यावें. 'होतों' असें उत्तर दिलें तर 'कोठें होतां? काय होतां? तेथून कां निघालां?' हे प्रश्न अर्थातच ठेवलेले आणि जोंपर्यंत आपल्यावर त्रिकमलालशेटजींनीं आणलेला आरोप साफ निघाला नाहीं, तोंपर्यंत अर्थातच या प्रश्नाचें उत्तर देणें केवळ अशक्य होय. बरें कोठें चाकरीला नव्हतों, नव्यानेंच चाकरी शोधतों आहें असें सांगितलें, आणि एखाद्या ठिकाणीं चाकरी मिळाली, तरी त्या ठिकाणीं पुढें मागें आपल्या या पूर्वींच्या चाकरीची हकीगत कळली तर कसें होणार? अशा प्रकारचे अनेक तर्क वितर्क मनांत उभे राहून त्याचें मन अत्यंत क्षुब्ध झालें होतें. तशा त्या स्थितींत त्याला काय सुचणार? दुकानांत जाऊन बसल्यापासून सरासरी प्रहर दीड प्रहर अशा प्रकारानें वांया गेला. तितक्या वेळांत त्याचें मन किंचित् स्वस्थ झालें व लागलीच त्याच्या मनांत असें आलें कीं, आपलें एक दोन दिवसांचें लिहिणें राहिलें आहे, तें तरी लिहून टाकून आपल्या पाठीमागें आणखी कांहीं शंका संशय घेण्याला कोणाला जागा ठेवूं नये. असा विचार करून त्यानें आपल्या वह्या पुढें ओढून काय लिहिणें होतें तें नीट लिहून ठेविलें. लिहिणें संपतें तों संध्याकाळ होऊन दिसेनासें होण्याची वेळ आली. तेव्हां वह्या नीट ठेवून आपल्या हाताखालच्या

नोकराला दुकान बंद करण्याला सांगून आपला पगार शेट-जींनीं जेथून घ्यावयाला सांगितला होता तेथून घेण्यासाठीं तो शेटजींच्या खोलीकडे गेला. तिकडे जातांना पुनः सकाळचा तो सर्व प्रसंग, शेटजींचीं तीं सगळीं बोलणीं, तो आपल्यावरील विलक्षण आरोप, इत्यादि गोष्टी मनांत येऊन त्याचे पाय अगदीं गळपटल्यासारखे झाले. आणि शेट-जींच्या खोलीच्या दाराशीं जाऊन तें दार उघडण्यासाठीं त्याला हात लावतात, तों त्याचे हात थरथरां कांपूं लागले, पण दार उघण्याच्या बेतालाच त्याला असें वाटलें कीं, आंत कोणीतरी खडबड करीत आहे. कदाचित् शेटजी अस-तील, असें वाटून त्यानें दार अर्धवट किलकिलें करून हळूच डोकावून पाहिलें. तों काय! काय त्याच्या नजरेस पडलें? शेटजींचा मुलगा मनसूखराम, ज्याच्याबद्दल कधीं कोणाच्या मनांत काडी इतकासुद्धां संशय यायचा नाहीं, तो एक मेणबत्ती घेऊन आपल्या बापाची पेटी उघडून कांहींतरी काढीत आहे. त्याच्यापुढें एक कागद आहे आणि त्यावर एक दोन नोटा व कांहीं रुपये दिसत आहेत. हा सर्व प्रकार दिसण्याबरोबर बळवंतरावाच्या मनांत एकदम लख्खन् उजेड पडल्यासारखें झालें. त्याच्या पायांत जोर आल्यासारखा झाला. त्याचें हृदय कांहीं आनंद, कांहीं संताप, कांहीं खेद इत्यादिकांच्या उचंबळ्यामुळें फारच जलद आणि मोठ्यानें उडूं लागलें. आतां आपल्या तोंडावरील

काळोखी दूर सारण्याला लवकर—ताबडतोब संधी सांपडली या विचारामुळें त्याला आनंद होत होता. "आपण चोरी करून त्याचा वहीम माझ्यावर यावा म्हणून, एकदां मी सट्याच्या व्यापारांत पडलों तेवढें या भामट्यानें आपल्या बापाजवळ येऊन सांगितलें, असा हा नीच." असें वाटून संताप आणि ही एकंदर स्थिति मनांत येऊन त्यास फार खेद झाला. पण आतां आपण संधी दवडतां कामा नये. भामट्या आपल्या अगदीं तावडींत सांपडला आहे. त्याला जाऊं न देतां त्याच्या बापाच्या निदर्शनास आणला पाहिजे. असें मनांत येऊन तो अगदीं हलकेच पुढें सरसावला, आणि त्या पुढें पडलेल्या नोटा व रुपये यांचें हा पोरगा पुढें काय करतो हें पाहून काय तें करावयाचें असा मनांत बेत करून त्यानें अगदीं पाऊल न वाजवितां त्याच्या मागें जाऊन तो मुकाट्यानें पहात उभा राहिला. मनसुखराम आपल्या चौर्यकर्मांत अगदीं गर्क होऊन गेला होता. आपल्या पाठीमागून कोणी येईल किंवा आला असेल अशी त्याच्या मनांत शंकासुद्धां आली नाहीं. बळवंतराव पहात उभा होता. इतक्यांत त्या पोरानें त्या दहा दहांच्या दोन नोटा आणि पांच रुपये हलकेच आपल्या खिशांत ठेवून देऊन पुढील उद्गार काढले:—"उद्यांपासून कायती पंचाईत. आज कांहीं नाहीं. आज तो बळवंतराव आपला पगार न्यायला आला तेव्हां त्यानेंच पुनः डल्ला मारला

असेंच पिताजींच्या मनांत येणार. मार्जीला मी इकडे आलों आहें हें मुळींच ठाऊक नाहीं तर आज तर करूं या आपलें काम!"

इतके त्याच्या तोंडून पुरते उद्गार निघतात न निघतात, तों बळवंतरावाचा संताप अगदीं अनावर होऊन त्यानें त्या पोराची मानगुटी धरून, "अरे पाजी, आपल्या बापाच्या पेटींतून रोज अशा चोऱ्या करून माझ्यावर आळ घालतोस अं? माझ्या गरीबाच्या पोटावर पाय—माझा संसार—माझी बायको माझा सर्वस्व नाश होण्याची पाळी तूं माझ्यावर आणलीस अं? दमधर आतां—"

बळवंतरावानें मनसुखरामाची मानगुटी इतक्या जोरानें धरली कीं, तो गुदमरल्याप्रमाणें होऊन त्याच्या तोंडून शब्द निघेना. त्याचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली. तो गयावया करूं लागला. जरा सैल सोडल्याबरोबर पायां पडून "बळवंतराव, एवढा वेळ गय करा, मी तुमच्यापुढें हात जोडतों. हें पहा मीं घेतलें तेवढें सगळें पुनः जिथल्या तिथें ठेवतों. आणखी मग पुनः सांगाल तें करीन, पण एवढा वेळ माफी करा. तुमचं मीं नुकसान केलं खरं, पण एवढा वेळ पिताजीला ही गोष्ट सांगूं नका."

पोरगा फारच गयावया करूं लागला तेव्हां शेवटीं बळवंतरावानें कींव करून त्यास मोकळा सोडला. मोकळा सुटतांच त्यानें आपल्या खिशांतले रुपये, नोटी पुनः पेटींत

टाकले, किल्ली लावली, आणि एकदम बळवंतरावाकडे वळून म्हणतो " बोला बच्चमजी, आतां काय म्हणतां तें? माझी कागाळी पिताजीला सांगणार काय? पाहुं बरें कोणावर विश्वास बसतो तो. तूं इथें पगार घ्यायला येणार हें मला ठाऊक म्हणून मी मुद्दाम लपून बसलों होतों. आतां या घरांतला आपला शेवटचा दिवस, तेव्हां शेवटला सांपडेल तेवढा डल्ला मारून जावें असा विचार करून तूं पेटी उघडून काय असेल नसेल तेवढें उपटणार हें मला ठाऊक म्हणून मी मुद्दाम लपून बसून राहिलों. शेवटीं माझ्या तर्काप्रमाणें होऊन तूं रुपये काढून घेऊन जात होतास तेव्हां मी तुला पकडला. आणखी पिताजी येई पर्यंत जाऊं देणार नाहीं. असें सांगितलें तेव्हां तूंच माझ्यावर कुभांड घेऊन कांहीं तरी येऊन सांगतों आहेस असें मी सांगतों, आणखी तुला काय सांगायचें तें तूं सांग, बस. बस पिताजी येईपर्यंत जाऊं नको." असें हंसत हंसत बोलून त्या पाजी पोरानें बळवंतरावावरच उलटें कुलंगडें आणलें. इतक्यानेंच संपलें नाहीं तर "मी असलें कांहीं बोलूं नये, तुला मुकाट्यानें जाऊं द्यावें, असं तुला वाटत असलें, तर तेवढा पगार दे तुझा माझ्या स्वाधीन करून." अशी अट त्यानें घातली.

बळवंतरावाला हें पक्कें दिसत होतें कीं, आपण आपली गोष्ट सांगितली आणि मनसुखरामानें आपली गोष्ट सांगि-

ो, तर विश्वास बसणार अर्थातच त्याच्यावर. आणि आपली
ाति आज आहे त्याच्यापेक्षां किती तरी वाईट होणार!
तें दिसण्याबरोबर बळवंतरावाला फारच वाईट वाटून तो
चारा तेथून जाऊं लागला; परंतु तो कारटा त्याला कोठें
ऊं देत होता? तो म्हणे तो पगार टाक, नाहीं तर मी
टल्याप्रमाणें कधीं करायला चुकणार नाहीं. ही पेटीची
ल्ली तुझ्यापासून हिसकावून घेतली म्हणून सांगेन. ही
निराळी बनविलेली आहे, परंतु पाहिजे तेव्हां उपयोगा
ायला सांपडावा, म्हणून तूंच ती बनविलीस असें,
र्थातच ही तुझी आहे, तुझ्यापासून मी हिसकावून घेतली
सें सांगितलें म्हणजे लोकांना काय वाटणार?

तो मुलगा कांहीं मोठा नव्हता; परंतु त्याची धिटाई
ाहून बळवंतरावास अतिशय नवल वाटलें व आल्यासंकटां-
ून सुटायचें कसें हेंच त्याला समजेना. शेवटीं बिचा-
्याला पगार त्या कारट्याच्या हातांत देऊन घरांतून बाहेर
ाण्यापलीकडे दुसरा मार्ग राहिला नाहीं. जीवापेक्षां—
किंबहुना जीवापेक्षांही जी त्यास अधिक प्रिय होती त्या
अब्रूपेक्षां पगाराची मातबरी काय? त्यानें पगाराची आशा-
सोडून त्याबरोबरच त्रिकमलालशेटजीचें घर सोडलें.
अरेरे! काय बिचाऱ्याची स्थिति! आणि घरीं गेल्यावर व
त्या आपल्या अत्यंत प्रिय अशा बायकोला आणि मुलांना
पाहण्याबरोबर तर त्याची काय बरें अवस्था झाली असेल!

त्या रात्रीं बळवंतराव एखाद्या वेड लागलेल्या माणसाप्रमाणें रेंगाळत रेंगाळत कसा तरी घरीं गेला. बिचाऱ्याचे पाय चालेचनात त्याला तो काय करणार? शेवटीं कसा तरी तो घरीं जाऊन पोंहोंचला. घरीं गेल्याबरोबर आतां बायकोला सांगावें काय आणि करावें काय? तिच्यावर त्याचा अगदीं जीव कीं प्राण, आणि तिला असें सांगावयाचें कीं, आपल्या तोंडचें अन्न आजपासून गेलें आणि तेंही तोंडाला काळोखी लागून! हें सांगावें कसें! तिचें तें दुःख पहावें कसें! या विचारांनीं त्याचें काळिज नुसतें करपून गेलें. परंतु आपल्या बायकोपासून कांहींही चोरून ठेवण्याचा विचार त्याच्या मनास कधीं शिवलाही नसता. घरीं गेल्यावर कांहीं वेळ बसून नंतर त्यानें स्वस्थपणें सर्व हकीकत जशी घडली तशी सांगितली. बायकोचाही त्याजवर अत्यंत विश्वास, आपला खरा खरा अपराध नसून नवऱ्यानें तेवढा झांकून आपल्याला हकिकत सांगितली असेल असें तिच्या स्वप्नींही आलें नसतें. तीं दोघें परस्परांस केवळ विश्वासस्थानें होतीं.

प्रायां चित्त स्त्रियांचे मृदुलचि असतें जाति पुष्पासमान।

या म्हणण्याप्रमाणेंच बळवंतरावांची पत्नी होती. तिचें चित्त अत्यंत मृदु परंतु प्रसंग पडला असतां अशा पतिव्रता स्त्रियांचीं चित्तें वज्रापेक्षांही कठोर होतात. त्या प्रसंगीं पुरुषांपेक्षांही अचाट धैर्य दाखवितात. बळवंत-

रावास या गोष्टीचा त्या प्रसंगीं अनुभव आला. त्याला स्वत:ला मुळींही धैर्य नव्हतें, परंतु त्याच्या बायकोनें किती तरी धैर्य दाखविलें. आपण हा सर्व प्रकार सांगितल्यावर तिला अतोनात दुःख होईल आणि मग आपण तिचें समाधान कोणच्या शब्दांनीं करावें, अशी जी त्याला भिती येऊन पडली होती, ती एकीकडेच गेली. तीच उलट त्याचें समाधान करूं लागली. जणूं काय आधींपासून किती दिवस या संबंधांत विचार केला होता अशाप्रमाणें आपण आतां पुढें काय करावें याच्या विषयीं ती गोष्टी सांगूं लागली. बळवंतराव आपली अब्रु साफ करून घेण्याच्या आणि मनसुखरामास शिक्षा करण्याच्या गोष्टी सांगूं लागला, तर तिनें त्याला त्या भानगडींत आपण पडूं नये, आपल्याला कधीं यश यायचें नाहीं; उलट आपली स्थिति अधिकाधिक वाईट होईल, देव त्यांचा समाचार घेईल असें सांगून तिनें त्याचें तसल्या त्या विचारांपासून मन वळविलें.

दुसरे दिवशीं त्यांनीं आपली सध्यांची जागा सोडून दुसरीकडे अगदीं गरिबीची खोली घेतली. जवळ कांहीं होतें नव्हतें तें विकून त्याचे रुपये केले, कारण चाकरी लागेपर्यंत चार आठ दिवस खाण्याची भ्रांत होती. ती माउली डगमगली नाहीं. पण नशीब नुसतें हात धुवून त्यांच्या पाठीस लागलें होतें. त्याला काय करणार? तिनें

कांहीं टोप्या वगैरे विकण्याचें काम चालविलें होतें, तर ज्या गुजराथ्या मार्फत त्या टोप्या येत असत, तो वारका. त्याचा मुलगा पाजी निघून त्यानें वाईट दृष्टी धरली. अर्थातच तिला तें काम सोडून द्यावें लागलें. दुसरीकडे पुष्कळ खटपट केली, परंतु कोठें ही जम बसेना. कोणाचें दळण कांडण पाहण्याची स्थिति आली, परंतु तेवढ्यानें काय भागणार? इकडे बळवंतराव रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत चाकरीसाठीं हिंडे, परंतु भर मुंबई शहरांत कोणी त्याला चाकरी देईना. त्यानें मुंबईचा अमुक व्यापारी मोहाल्ला म्हणजे सोडला असें नाहीं; ज्यानें त्यानें त्याला पूर्वी कुठें होतां काय? म्हणून विचारावें. यानें अमूक ठिकाणीं होतों म्हणून सांगावें. तेथून कां निघाला असा त्यांचा लागलांच प्रश्न यावा. यानें गुटमळावें. त्यांनीं, त्यांची चिठ्ठी आणा, मग पाहूं असें सांगावें. असें एक-सारखें चाललें होतें. बिचारा अतोनात त्रासला. अतिशय खंगला. त्याचीं हाडें दिसूं लागलीं. चेहरा अगदीं फिक्कट पडला. डोळे निस्तेज होऊन खोल गेले. आतां आपलें पोट भरावयाचें तरी कसें? आणखी चार दिवस जर आतां चाकरी लागली नाहीं, तर आपल्याला, आपल्या बायकोला, पोरांना उपास करण्याची पाळी येणार हें त्याच्या डोळ्यांपुढें स्पष्टपणें दिसूं लागलें.

एके दिवशीं अशा स्थितींत तो घरीं आला, आणि तोंड खालीं घालून कोंपऱ्यांतल्या वळकटीशीं जाऊन बसला. इतक्यांत त्याची बायको त्याच्या जवळ आली आणि कांहीं कुठें जुळलें का म्हणून विचारूं लागली. अर्थातच त्यानें 'कांहीं नाहीं' असें अत्यंत कष्टानें उत्तर दिलें.

"कांहीं हरकत नाहीं. उद्यां आणखी कुठें तरी पहा. निराश होऊन काय उपयोग?" असें किंचित् स्मित् मुखानें ती बोलली.

"पण उद्यां खायला तरी कांहीं आहे?" त्यानें अत्यंत निराशेनें विचारलें.

"हो. हो. तीन आणे माझ्याजवळ आहेत. आणखी सहा दिडक्या उद्यां माझ्या दळणाच्या येतील."

"एवढ्यांत कसें होणार?"

"न व्हायला काय झालें? तुम्हांला मी भात करून घालीन. आणखी उद्यां आतां पायीं नाहीं हिंडायाचें. दोन आणे घेऊन जावें. ट्राम्बेंत बसून जावें कुठें जायचें तें?"

वळवंतरावाच्यानें पुढें ऐकवेना. त्यानें तिचा हात धरला आणि तो तिच्या मुखाकडे कांहीं चमत्कारिक रीतीनें पाहूं लागला. त्याच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले.

"हें काय हें गडे असलें? असें निराश होऊन कसें चालेल? माझें आणखी पोरांचें मी कसें पाहिजे तसें करीन

आपण सकाळीं भात खाऊन हे पैसे घेऊन जावें. देव आपला इतका अंत खास पहाणार नाहीं. त्याला खचित खचित करुणा येईल आणखी आज तो आपल्याला कांहींना कांहीं तरी काम देईल."

या बोलण्यानें तर बळवंतरावाची स्थिति फारच विलक्षण झाली. त्यानें तिला घट्ट पोटाशीं धरलें आणि आपण एकसारखा अश्रु ढाळूं लागला.

"नको. नको गडे हं! असं काय करावं. अशानं माझं कसं बरं काम होईल. हें दोन पायल्या दळण सकाळच्या आंत झालं तर पैसे मिळतील. चलावं, लवकर जेवून मुलांना घेऊन निजावं, म्हणजे आपल्याला सकाळपर्यंत विश्रांती मिळेल. आणखी मलाही स्वस्थपणानं दळणें होईल."

इतकं म्हणून ती उठलीच. तिनें जसें सांगितलें तसें त्यानें केलें. सकाळच्या प्रहरीं उठून स्नान करून भाताचे दोन घांस खाऊन तो बाहेर पडला. बाहेर पडतेवेळीं त्याच्या मनाची किती तरी वाईट स्थिति झाली होती!

संध्याकाळीं तो परत आला, तों त्याच्यानें दारांत पाऊल टाकवेना. त्याच्या अंगांत मुळींसुद्धां ताकद राहिली नाहीं. आपण, आपली बायको, आपलीं मुलें सगळ्यांनीं मिळून एकदांच वीष घ्यावें आणि सर्व संकटांची इतिश्री करून घ्यावी असा भयंकर विचार त्याच्या मनांत आला. त्यानें

दार लोटलें. त्याची बायको कांहीं शिवीत होती. तिनें त्याची चाहूल ऐकण्याबरोबर म्हटलें,

" आलांत? मी केव्हाची वाट पहातें; मिळालें का कुठें कांहीं काम? नाहीं?"

तिच्याही बोलण्याचा आतां निराशेचा ध्वनी निघूं लागला असें त्याला वाटलें. परंतु तो तिनें शब्दांत व्यक्त केला नाहीं. ती लागलीच त्याला म्हणाली, "बरं कांहीं हरकत नाहीं. उद्यांची मीं तजवीज केलीच आहे. हा एवढा त्या कुवर-बाईच्या मुलीचा पोलका रातोरात शिवून दिला तर ती चार आणे देणार आहे. उद्यांचा दिवस गुजरेल. आतां मी भात करतें तो खाऊन निजावें. आज फारच थकल्यासारखं दिसतं आहे."

इतकें बोलून ती उठली. बळवंतराव बिचारा स्वस्थ कोंपऱ्यांत बसला. त्याला आतां दुसरें तिसरें कांहीं सुचत नव्हतें. त्याच्या मनांत भयंकर विचार घोळत होते. एकंदर आतां आपण सर्वत्रांना घेऊन मुंबई सोडून जावें किंवा सर्वांची एकदांची कांहीं तरी वाट लावावी. सर्वत्रांनीं कोठेंही जाणें शक्यच नाहीं. कारण जाणें म्हणजे तरी पैशाचें काम आहे. ते पैसे आणतां कोठले? तेव्हां आतां विचार एकच आणि तो विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. त्यानें आपल्याकडून तो विचार दूर सारण्याकरितां अतोनात खट-पटी केल्या; परंतु तो कांहीं दूर जाईना आणि मनाची तळ-

मळ नाहींशी होईना. अशा रीतीनें तळमळत असतांच, त्याला असा भास झाला कीं, आपल्याला कोणीना कोणी हांक मारीत आहे. एवढ्या रात्रीं आपल्याला हांका मारणारा कांहीं आपल्या बऱ्यासाठीं आला नाहीं खास हें त्याला तेव्हांच दिसलें. तरी पण आशा ही कोठें सुटली आहे? तो धडपडून उठला. इतक्यांत हांका मारणारा दारांत आला आणि "बळवंतराव, बळवंतराव कोन है? तुमकू अबी सेट बुलाते है" असें दरडावून म्हणाला. बोलावणाऱ्याच्या अंगांत काळा बनातीचा कोट, तशाच रंगाची विजार आणि डोक्याला तांबडी टोपी असून हातांत एक दंडुकल्याचा चाबूक होता. त्या माणसास पाहण्याबरोबर तर त्या दोघां नवरा बायकोचें धाबें दणाणलें. आतांपर्यंत केवळ दारिद्र्याचीच काळजी होती, आतां ही नवीच एक भीति उत्पन्न झाली. हा रामोशी आपल्याकडे काय म्हणून आला, आणि "सेट बुलाते है" म्हणतो याचा अर्थ काय? इतक्यांत त्यानें तर निकडच लाविली. शेट कोण म्हणून विचारतां, "त्रिकमलालशेट" म्हणून उत्तर दिलें. आपल्याला घालवून आज दोन महिने झाले, मध्यंतरी कांहीं संबंध नाहीं, आणखी मध्येंच आतां हें काय? कांहीं समजेना, बिचाऱ्यानें येतों म्हणून मुकाट्यानें आपले ते मळके कपडे चढविले आणि त्या रामोशाबरोबर चालला. बाहेर रस्त्यावर येतो तों एक गाडी उभी असून तींत शिरून बसण्याविषयीं

तो शिपाई आग्रह करूं लागला. तुला गाडींत घालून आणण्याबद्दल मला सांगितलें आहे असें त्यानें सांगितलें. बळवंतराव त्याच्याबरोबर बसला. गाडी जोरानें चालूं लागली. त्रिकमलालशेटच्या घराशीं गाडी गेली. बळवंतराव उतरतांच त्याला तडक त्रिकमलालच्या खोलींत नेलें. घरांत जिकडे तिकडे गडबड उडून गेली, ती कां? हें त्याच्या कांहींच लक्षांत येईना. त्रिकमलालच्या खोलींत जातो, तों शेटजी अगदीं मरणोन्मुख झालेले दिसले. याची व त्यांची नजरानजर होतांच त्यांनीं सर्व मंडळीस बाहेर जाण्याविषयीं खुणा करून ती मंडळी गेल्यावर त्याच्या कानांत सांगितलें. "बळवंतराव, माझ्या रकमा कशा जात हें मीं एकदा प्रत्यक्ष पाहिलें. मीं तुम्हांला नाहक दोष दिला, मला क्षमा करा. आणि कालच मीं वुइल केलें आहे, तें हिरालाल मोतीचंद वकील यांचे स्वाधीन आहे. त्यांत लिहिल्याप्रमाणें सर्व व्यवस्था करा. मी तुमच्यावर भार टाकून स्वस्थ मरतों."

इतकें बोलल्यानंतर खरोखरीच दोन चार तासांत तो म्हातारा वारला.

त्यानें म्हटल्याप्रमाणें आपल्या पोरास पेटींतून रकमा चोरतांना प्रत्यक्ष पाहिलें. पुढें त्याच्या बदफैली वर्तनाचाही त्यास अनुभव आला. तेव्हांपासून त्यानें हाय घेतली आणि आपल्या धाकट्या मुलाच्या नांवानें वुइल करून

बळवंतरावाच्यासंबंधानें केलेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं त्यासच आपले व्यवस्थापक नेमलें होतें. त्यांत स्पष्ट असें लिहिलें होतें कीं, बळवंतरावानें आपला मुनीम या नात्यानें सर्व कारभार चालवावा. आणि थोरल्या मुलास फक्त खाण्याची पंचाईत पडूं नये म्हणून रुपये २० दरमहा द्यावे. धाकटा मुलगा उत्तम प्रकारचा निपजेल अशाबद्दल काळजी घेऊन त्याचें शिक्षण करावें. तो निघाला तर उत्तमच, न निघाला तर त्यालाही रुपये २० दरमहा मिळतील अशी तजवीज करून बाकीच्या इस्टेटीचा सात—अष्टमांश भाग धर्मार्थ देऊन टाकावा.

परंतु तशी स्थिति झाली नाहीं. बळवंतराव मुनीम होऊन त्यानें कारभार उत्तम प्रकारें चालवून इस्टेटीची भरभराट केली व त्या मुलाचें शिक्षण फारच उत्तम प्रकारानें केलें.—सत्यनिष्ठेचें फळ होतें तें असेंच !

व्यक्ति संघाच्या हालचालींचीं असतात. हें रीळ बसवून चावी फिरविली असतां रीळ फिरूं लागतें. व पाहण्याकरितां केलेल्या द्वारांत पाहिलें असतां मुळापेक्षां चौपट पांचपट मोठें असें चित्र आपणास दिसतें. त्यामुळें आपण पाहत असलेली केवळ चित्रांची हालचाल नसून खरोखर एखाद्या सजीव व्यक्तीची हालचाल आहे असा भास होतो. ह्यानें बसल्या बसल्या सहज करमणूक होते. यात्रेच्या वगैरे ठिकाणीं प्रदर्शन करून पैसे मिळविण्यासही हें उपयोगी आहे. प्रत्येक यंत्राची एका रीळ-सह किंमत रु. ४२. प्रत्येक निराळे रीळास किंमत रु. ११.

घटकाभर

करमणुकीच्या

२१ व्या अंकांत

दोन चित्रें,

तीन फुलें,

दोन पेले,

केलेला उपमर्द.

ह्या चार गोष्टी प्रसिद्ध होतील.